CMYK

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भाजपचं ऑपरेशन लोटस! आपचे ७ खासदार फुटले

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाचे राज्यसभेचे खासदार राघव चड्ढा यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. शुक्रवारी एक पत्रकार परिषद घेत त्यांनी भाजपसोबत विलिनीकरणाची घोषणा केली. आपल्यासह राज्यसभेतील दोन तृतीयांश खासदार भाजपमध्ये जाणार असल्याची घोषणा चड्ढा यांनी केली. विशेष म्हणजे यामध्ये राघव चड्ढा यांना हटवून राज्यसभेत पक्षाचे उपनेते करण्यात आलेल्या अशोक मित्तल यांचाही समावेश आहे. राज्यसभेत आपचे १० खासदार आहेत. यातील तिघे दिल्लीतून, तर सात जण पंजाबमधून राज्यसभेवर गेले आहेत. आम आदमी पक्ष आपल्या आदर्शांपासून, सिद्धांतापासून दूर गेला आहे. त्यामुळे जड अंतकरणानं पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्याचं खासदार राघव चड्ढा म्हणाले. 'मी चुकीच्या पक्षातील योग्य माणूस असल्याची जाणीव गेल्या काही वर्षांमध्ये झाली. आता मीआम आदमी पक्षापासूनदूर जात आहे आणि जनतेच्या जवळ जात आहे,' असं चड्ढा यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. आपल्या सोबत आपला सोडचिठ्ठी देणाऱ्या खासदारांची नावंदेखीलराघव चड्ढायांनी सांगितली. पक्षाचा राजीनामा, विलिनीकरणाबद्दलची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यसभेतील पक्षाचे दोन तृतीयांशपेक्षा जास्त खासदार भाजपमध्ये विलीन होत असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यसभेत आपचे एकूण १० खासदार असून त्यातील ७ जण चड्ढा यांच्यासह भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. विलिनीकरणाच्या कागदपत्रांवर सात खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यांच्या स्वाक्षऱ्या असलेलं पत्र राज्यसभेच्या सभापतींना पाठवण्यात आलं आहे. चड्ढा यांच्यासह पक्ष सोडणारे अशोक कुमार मित्तल, संदीप पाठक पत्रकार परिषदेला उपस्थित होते. पक्षात प्रचंड घुसमट होत आहे. आधी देशहिताचा विचार करणारा पक्ष आता केवळ वैयक्तिक हिताचा, फायद्याचा विचार करत आहे. त्यामुळेच पक्षापासून दूर जात असल्याचा निर्णय घेतल्याचा दावा चड्ढांनी केला



**कोणकोणते खासदार आप सोडणार?**

१. राघव चड्ढा
२. स्वाती मालीवाल
३. अशोक कुमार मित्तल
४. संदीप पाठक
५. हरभजन सिंह
६. बलबीर सिंह सीचेवाल
७. विक्रमजीत सिंह साहनी

## वृद्ध कलावंतांची प्रलंबित आधार पडताळणी तात्काळ करा : अशिष शेलार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई:** राज्यातील वृद्ध कलावंतांना मानधन मिळण्यात अडथळा ठरणाऱ्या आधार पडताळणी प्रक्रियेची तातडीने पूर्तता करून या वृद्ध कलावंतांचे मानधन तत्काल मिळायला पाहिजे. तसेच निष्क्रिय असलेले 'आपले सरकार सेवा केंद्रे' त्वरीत कार्यान्वित करावीत, असे स्पष्ट निर्देश सांस्कृतिक कार्य आणि इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड.आशिष शेलार यांनी दिले .

मंत्री शेलार यांच्या अध्यक्षतेखाली आज पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांतील 'आपले सरकार सेवा केंद्रे', आधार सेवा आणि वृद्ध कलावंत मानधन यासंदर्भातील विषयांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव महेश वाव्हळ, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभिषण चवरे तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, महाआयटी संचालक भुवनेश्र्वरी तसेच जिल्हाधिकारी जालना, लातूर, परभणी, बुलढाणा, मुंबई उपनगर उपस्थित होते.

मंत्री शेलार म्हणाले की, जालना, लातूर, परभणी, बुलढाणा तसेच मुंबई उपनगर जिल्ह्यांमध्ये वृद्ध कलावंतांचे आधार पडताळणी प्रलंबित असल्यामुळे त्यांना मानधन मिळण्यात अडचणी निर्माण होत आहेत. यावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी तातडीने कार्यवाही करून पात्र कलावंतांना लवकरात लवकर मानधन द्यावे.राज्यातील जी 'आपले सरकार सेवा केंद्र निष्क्रीय म्हणजे ज्या केंद्रांवर कोणतेही व्यवहार होत नाहीत, अशा सर्व निष्क्रिय केंद्रांची तपासणी करून ती तातडीने सुरू करावीत किंवा आवश्यक असल्यास त्यांचे पुनर्स्थापन करावे, असे निर्देशही मंत्री शेलार यांनी दिले.

## गडकरींना धमकी देणारा आरोपी अटकेत

**नवी दिल्ली :** सोशल मीडियावर भडकाऊ आणि आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला नागपूर पोलिसांनी अटक केली आहे. या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीविरुद्ध विविध गंभीर गुन्हे दाखल केले आहेत.

## मंगेश जोशी यांची नियुक्ती

**मुंबई :** मंगेश जोशी यांनी यापूर्वी रत्नागिरी जिल्ह्यात दापोलीत प्रांतअधिकारी म्हणून काम पाहिले आहे त्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी त्यानंतर पुणे महानगरपालिकेत उपायुक्त नागपूर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी पुण्यातील यशदा ट्रेनिंग सेंटर नंतर आता थेट महाराष्ट्र पर्यटन बोर्डाच्या संचालकपदी नियुक्ती नुकताच त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला आहे

## वडेट्टीवार आक्रमक

**मुंबई :**'शिवाजी कोण होता' पुस्तक प्रकरणी आमदार संजय गायकवाड यांच्या कथित धमकीवरून वाद पेटला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी कठोर कारवाईची मागणी करत अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित केला. सरकारकडून निष्पक्ष चौकशीची भूमिका मांडण्यात आली असून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत.

## दरोड्याचा कट उधळला

**मुंबई :** मुंबई-सोलापूर सिद्धेश्र्वर एक्सप्रेसमध्ये दरोड्याच्या तयारीत असलेल्या ९ महिलांच्या टोळीला आरपीएफने अटक केली. कुर्डवाडी येथे संशय आल्याने सतर्कता वाढवण्यात आली होती. सोलापूर स्थानकावर विशेष पथकाने कारवाई करत सर्व आरोपींना ताब्यात घेतले. पुढील तपास सुरू असून ही टोळी सोलापूर-पुणे विभागात सक्रिय असल्याची शक्यता आहे.

# मे महिन्यात कोकणवासियांना मिळणार खास भेट!

## आठवड्यातून तीन दिवस दिवा-चिपळूण अनारक्षित मेमू सेवा

**तभा वृत्तसेवा**

**ठाणे :** कोकणवासियांसाठी एक आनंदाची बातमी आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये होणाऱ्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. कोकण रेल्वे मार्गावरून अतिरिक्त मेमू ट्रेन या उन्हाळ्यात धावणार असून वीकेंडला धावणाऱ्या या ट्रेनमुळे कोकणवासियांना मोठा फायदा होणार आहे. १ मे ते ७ जूनदरम्यान ही विशेष मेमू ट्रेन धावणार आहे. दिवा ते चिपळूण अनारक्षित मेमू ट्रेन आठवड्यातून तीन दिवस धावणार आहे. ही मेमू लोकल आठ डब्ब्यांची असून वीकेंडदरम्यान तीन दिवस धावणार आहे. त्यामुळे महिन्याभरातदिवा ते चिपळूण१८ आणि परतीच्या मार्गावर चिपळूण ते दिवा १८ अशा एकूण ३६ फेऱ्या होतील. परंतु, ही ट्रेन केवळ आठ डब्ब्यांची असून त्यात आठवड्यातून फक्त तीन दिवस धावणार असल्यामुळे प्रवाशांना कितपत फायदा होईल असा प्रश्र्न उपस्थित केला जात आहे.दरवर्षी उन्हाळ्यांच्या सुट्ट्यांमध्ये वाढणारी ट्रेनची मागणी पाहून कोकण रेल्वे मार्गावर ही विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गुरुवारी याबद्दल अधिकृत वेळापत्रक जारी केलं गेलं आहे. या वेळापत्रकानुसार दिवा ते चिपळूण अनारक्षित मेमू सेवा आठवड्यातून शुक्रवार, शनिवार, रविवार असे तीन दिवस धावणार आहे. शाळा-कॉलेजला सुट्ट्या लागल्यानंतर सर्वांची पावले शहरापासून गावच्या दिशेने धावू लागतात. अशा वेळी कोकण रेल्वे मार्गावर आधीच गाड्यांची संख्या प्रवाशांच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे हीविशेष मेमू ट्रेनसुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला.




# विधान परिषदेसाठी भाजपचे 'धक्कातंत्र' ?

## संभाव्य ३० उमेदवारांची यादी दिल्लीला

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या १० जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होत असून, संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला येणाऱ्या ६ जागांसाठी पक्षाने ३० संभाव्य उमेदवारांची यादी दिल्लीतील पक्षश्रेष्ठींकडे पाठवली आहे. या यादीत प्रज्ञा सातव यांचे नाव जवळपास निश्र्चित मानले जात असले, तरी उर्वरित ५ जागांसाठी अनुभवी नेत्यांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू आहे. यंदा भाजप पराभूत उमेदवारांऐवजी संघटनेतील नव्या चेहऱ्यांना संधी देत 'धक्कातंत्र' अवलंबण्याची चिन्हे आहेत.विधानसभेतील पक्षीय बलाबल पाहता, भाजपला सहा जागा सहज निवडून आणता येतील. त्यासाठी प्रत्येकी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीचे एकूण ८ आमदार निवडून येणे सोपे असले, तरी भाजपने आपल्या कोट्यातील सहा जागांसाठी कोअर कमिटीमार्फत नावे अंतिम केली आहेत. या यादीत मुख्यत्वे माधवी नाईक, उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, राजेश पांडे आणि राम सातपुते यांसारख्या नावांचा समावेश आहे. मात्र, लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागलेल्या नेत्यांना पुन्हा 'मागच्या दाराने' संधी द्यायची नाही, असे कठोर धोरण पक्षाने स्वीकारल्याचे समजते.जे लोक जनतेतून निवडून येत नाहीत, त्यांचे राजकीय पुनर्वसन विधान परिषदेवर करणे योग्य नाही, असे मत भाजपमधील एका ज्येष्ठ नेत्याने व्यक्त केले आहे. त्यामुळे इच्छुकांच्या लांबलचक यादीतून अनेक बड्या नेत्यांची नावे कापली जाण्याची शक्यता आहे. याउलट, जातीय समीकरणे साधणारे आणि संघटनेत दीर्घकाळ काम करणाऱ्या निष्ठवान कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.काही दिवसांपूर्वीच काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश केलेल्या माजी आमदार प्रज्ञा सातव यांचे पुनर्वसन निश्र्चित मानले जात आहे. भाजपच्या कोट्यातील सहापैकी एक जागा सातव यांना दिली जाईल, असे सूत्रांचे म्हणणे आहे. उर्वरित पाच जागांसाठी कोल्हापूरपासून नागपूरपर्यंतच्या अनेक नेत्यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीचे संख्याबळ ४६ असल्याने त्यांचा केवळ एक उमेदवार निवडून येऊ शकतो. या पार्श्र्वभूमीवर, भाजप आपल्या उमेदवारांची घोषणा करताना कोणती नवी समीकरणे मांडते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. उमेदवारांची अंतिम घोषणा पुढील आठवड्यात दिल्लीतून होण्याची शक्यता आहे.

**यादीत कोणाची नावे ?**

**माधवी नाईक, उपेंद्र कोठेकर, मनोज कोटक, केशव उपाध्ये, रवी अनासपुरे, राजेश पांडे, दयाशंकर तिवारी, राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, संजयकाका पाटील, विवेक कोल्हे, जगदीश मुळीक, प्रमोद जठार, अर्चना पाटील चाकूरकर, दादाराव केचे.**

# एमआयडीसी-कॉस्मे कराराने कोरियन गुंतवणुकीसाठी महाराष्ट्राला नवे बळ ; गुंतवणूक, कौशल्यविकास आणि तंत्रज्ञान सहकार्यास चालना

**कॉस्मेमार्फत कौशल्य विकासासाठी कोरिया बिझनेस कल्चर प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्रात सुरू करण्याचे नियोजन आहे.**

**नवी दिल्ली: कोरियन कंपन्यांचा महाराष्ट्रातील गुंतवणुकीकडे वाढता कल लक्षात घेऊन महाराष्ट्र द्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि कोरिया एसएमई अँड स्टार्टअप्स एजन्सी डॉस्मे) यांच्यात दि. २० एप्रिल २०२६ रोजी नवी दिल्ली येथे गुंतवणूक प्रोत्साहन, कौशल्यविकास आणि औद्योगिक सहकार्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला.**

**महाराष्ट्रातील कोरियन गुंतवणूकीच्या संधी, औद्योगिक सुलभीकरण, कौशल्यविकास नाणि तंत्रज्ञान सहकार्याबाबत पुणे येथे नुकत्याच झालेल्या परिषदेत एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आणि कॉस्मेच्या उच्चस्तरीय अधिका-यां समवेत सविस्तर चर्चा झाली आहे. सदर चर्चेचा पुढील भाग म्हणून हा करार आकाराला आला असून, यावेळी एमआयडीसीच्या सह मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, महाव्यवस्थापक (पणन) डॉ. विकास सूर्यवंशी तर कॉस्मेचे उपाध्यक्ष जंग ह्युग पार्क यांच्या समवेत इतर अधिकारी उपस्थित होते. कराराचा मुख्य उद्देश कोरियातून महाराष्ट्रात गुंतवणूक सुलभ करणे आणि राज्यातील बद्यमान कोरियन उद्योगांच्या विस्तार योजनांना पाठबळ देणे हा आहे.**

**सहकार्याची रचना तीन मुख टप्प्यात करण्यात आली असून, पहिल्या टप्प्यात कोरियन एमएसएमई आणि स्टार्टअप्ससाठी हाराष्ट्रातील गुंतवणूक संधींचे प्रोत्साहन आणि सुलभीकरण केले जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात शिक्षण, क्षमता विकास आणि उद्योगाभिमुख कौशल्यवृद्धीच्या माध्यमातून भविष्यातील कुशल ननुष्यबळ तयार करण्यावर भर दिला जाणार आहे.**

**तिसऱ्या टप्यात प्रगत आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात माहितीची देवाणघेवाण, औद्योगिक आधुनिकीकरण, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन आणि शाश्र्वत उत्पादनासाठी सहकार्याचा शोध घेतला जाणार आहे. गुंतवणूक सुलभीकरणाअंतर्गत कोरियन एमएसएमई आणि स्टार्टअप्समध्ये महाराष्ट्रातील संधींबाबत जनजागृती करणार आहे. दोन्ही संस्था भारत आणि कोरिया येथे गुंतवणूक शिष्टमंडळे, व्यवसाय मिशन्स आणि रोडशो आयोजित करण्यास सहकार्य करतील. तसेच क्षेत्रनिहाय गुंतवणूक संधी आणि औद्योगिक प्रकल्पांबाबत माहितीची देवाणघेवाण केली जाणार आहे.**

**कोरियन कंपन्यांसाठी सिंगल-विंडो सुलभीकरण यंत्रणा मजबूत करण्यासाठी एमआयडीसी नोडल संस्था म्हणून समन्वयाची भूमिका बजावेल.महाराष्ट्रातील विद्यमान आणि नव्याने येणाऱ्या कोरियन उद्योगांकरीता व्यवसाय सुलभतेसाठी औद्योगिक निर्देशिका तयार करण्याचाही विचार या करारात आहे. तसेच उत्पादन, असेंब्ली आणि लॉजिस्टिक्ससाठी योग्य औद्योगिक क्षेत्रे, जमीन पर्याय आणि मूलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यास दोघांकडून सहकार्य केले जाणार आहे. कॉस्मेमार्फत कौशल्य विकासासाठी कोरिया बिझनेस कल्चर प्रशिक्षण**



CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## रामेश्वर येथे अखंड हरिनाम सप्ताह व अनुष्ठान यज्ञ

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** तालुक्यातील मौजे रामेश्र्वर येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सुरु असलेल्या संत श्री गोपाळ बुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह व शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा भक्तिमय वातावरणात सुरू असून या सोहळ्यात लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड गुरुवारी आवर्जून सहभागी झाले व यज्ञात आहुती दिली. विश्र्वधर्मी डॉ. विश्र्वनाथजी कराड साहेब यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या विश्र्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचा शुक्रवारी वास्तुशांती सोहळा होत आहे.

गेल्या ५५ वर्षापासून सुरू असलेला संत श्री गोपाळ बुवा महाराज अखंड हरिनाम सप्ताह याही वर्षी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात गेल्या १९ एप्रिल पासून सुरू झाला असून याची २६ एप्रिल रोजी ह.भ.प. नारायण महाराज उत्तरेश्र्वर पिंपरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहात शिवशक्ती अनुष्ठान यज्ञ सोहळा सुरू असून सप्ताहात काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, गाथा भजन, रामायण, हरिपाठ, किर्तन, हरीजागर असे दैनंदिन कार्यक्रम होत आहेत.



## विविध वृत्त...

## प्रवाशांचे अतोनात हाल

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लातूर ला औशातून येणाऱ्या प्रवाशांची संख्या खूपच मोठी आहे त्यात नोकरदार ,विद्यार्थी, व्यापारी आदींचा समावेश आहे

हल्ली बस भाडे३६ वरून ४२ केले असले तरी बस फक्त शिवाजी चौका पर्यंत येत आहे, याविषयी कंडक्टर कडेचौकशी केली असता डिझेल भरावयाचे आहे त्यामुळे बस पुढे जात नाही . प्रवाशांना शिवाजी चौकातून मुख्य बस स्थानकाकडे जाण्यासाठी रिक्षाने १५ रु. देऊन जावे लागत असल्याने हा अतिरिक्त भार प्रवाशांवर दररोज पडत आहे

## बनावट ऑईल देऊन ३१ लाख रुपयांची फसवणूक

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** प्राण्यांच्या रोगावर उपयोगी असल्याचे भासवून २१ लिटर बनावट ऑईल विकत देऊन तब्बल ३० लाख ८५ हजार १०० रुपयांना एकाला गंडा घातल्याची घटना लातूरमध्ये घडली.

शहरातील व्यापारी दिनेश मांगीलाल बांगड (रा. मंठाळे नगर, लातूर) यांना आरोपी रवीकुमार, प्रीती नायर, पूनम गवारे व ज्ञानेश्र्वर सूर्यवंशी यांनी आम्ही जागतिक पातळीवरील नामांकित कपनीचे ऑईल विक्री करीत आहोत, ते ऑईल इतरत्र कुठेही उपलब्ध नाही', असे भासवून बांगड यांना तब्बल २१ लिटर ऑईल विकत घेण्यास भाग पाडले. त्यासाठी आरोपी रवी कुमारसह अन्य आरोपींनी त्यांच्याकडून ३० लाख ८५ हजार १०० रुपये घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक केली. बांगड यांच्याकडे सदर २१ लिटर ऑईल आल्यानंतर त्याचा कोणताही परिणाम जाणवत नव्हता. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे बांगड यांच्या लक्षात आले. त्यांनी तत्काळ गांधी चौक पोलीस ठाणे गाठले. त्यांच्या फिर्यादीवरून गांधी चौक पोलीस ठाण्यात चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक लोहेकर हे या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लग्नात तुझ्या घरच्यांनी एक रुपयाही हुंडा दिला नाही, आता घराचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी पाच लाख रुपये व दोन तोळे सोने घेऊन येण्याची मागणी करीत विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी आरोपी पतीसह सासू व सासऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी मानसी मयुरेश जोशी (वय २४, रा. जुना सुभाष रोड बीड, हा. मु. नीला रेसिडेन्सी पापविनाश रोड, लातूर) हिला तिचा पती मयुरेश धोंडीराज जोशी, सासरे धोंडीराज जोशी व सासू मंजुषा धोंडीराज जोशी हे पैशासाठी त्रास देत होते. तुझ्या माहेरच्यांनी लग्नात एक रुपयाचाही हुंडा दिला नाही. आता घराचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी पैसे कमी पडत आहेत. हुंडा म्हणून तू माहेरच्यांकडून ५ लाख रुपये घेऊन ये, त्याचप्रमाणे लग्नासाठीची दोन तोळे सोने आणून दे, असे म्हणून पीडित विवाहिता मानसी हिचा पतीसह सासू व सासरेही छळ करीत होते. या छळाला कंटाळून मंजुषा हिने लातूरच्या भरोसा सेलकडे अर्ज केला. भरोसा सेलने आरोपींची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, हुंडा व सोने घेण्यावर ते ठाम होते. यामुळे शिवाजी नगर पोलीस ठाण्यात तिन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल आहे.

## ३०० प्रगणकांना जनगणनेचे प्रशिक्षण

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** तालुक्यात नियुक्त करण्यात आलेल्या जनगणना प्रगणक व पर्यवेक्षकांसाठी पहिल्या प्रशिक्षण सत्राचे आयोजन स्वामी विवेकानंद महाविद्यालयात करण्यात आले होते. याचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी रोहिणी नन्हे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा प्रगणक समन्वयक अधिकारी विठ्ठल परब, तहसीलदार सौदागर तांदळे, निवासी नायब तहसीलदार गणेश सरोदे, जिल्हा समन्वयक बालाजी शेळके उपस्थित होते. प्राचार्य गोविंद शिंदे व मारुती सूर्यवंशी यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. ३०० प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण झाले. ते १२ फिल्ड ट्रेनरने दिले.

यासाठी डिजिटल बोर्ड असलेल्या सहा कक्षाची व्यवस्था करण्यात आली. जनगणना दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यात घर यादी बनविण्यात येणार आहे. याचे काम १६ मे ते १४ जून या कालावधीत होणार आहे. एक १ ते १५ मे या कालावधीत जनतेला स्वगणना करता येणार आहे. त्यासाठी संकेतस्थळाचा वापर करून प्रत्येकाने आपली गणना करावी, असे आवाहन रोहिणी नव्हे यांनी केले.

जनगणना करताना कोणताही भाग सुटणार नाही, कोणताही भाग दुबार होणार नाही, याची दक्षता घ्यावी, त्यासाठी हे ३ दिवसांचे प्रशिक्षण आहे, ते व्यवस्थित व्हावे, अशा सूचना तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केल्या. सदरील प्रशिक्षणासाठी संपत माने, सचिन पवार, मदन मलवाडे, सोपान बेंबडे यांनी परिश्रम घेतले.

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची नूतन जिल्हा वकील मंडळाने घेतली भेट

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** राज्याचे माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांची दि. २३ एप्रिल रोजी आशियाना निवासस्थानी नूतन लातूर जिल्हा वकील मंडळाच्या संचालकांनी सदिच्छा भेट घेतली व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी वकील मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी लातूर जिल्हा वकिल मंडळाचे अध्यक्ष अँड. शिवकुमार जाधव, उपाध्यक्ष अँड. लहू चामे, सचिव अँड. येरटे, सहसचिव अँड. सिद्धेश्र्वर धायगुडे, ग्रंथालय सचिव अँड. आर्वीकर, कोषाध्यक्ष अँड. राठोड, महीला उपाध्यक्ष अँड. मंजुषा शिंदे, महिला सहसचिव अँड. श्रद्धा पाटील, स्वीकृत सदस्य अँड. शिंदे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड. जाधव, जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

## काँग्रेसने महिला आरक्षण धोरणास विरोध केल्याने येणाऱ्या काळात या विषयाला धरून आंदोलन करणार : प्रेरणा होनराव




तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने सतत महिलांचा हक्क डावलण्याचे काम केले आहे. काँग्रेसनेमहिला आरक्षण धोरणासविरोध केल्याने येणाऱ्या काळात या विषयाला धरून भाजप तीव्र आंदोलन करणार असल्याचे प्रतिपादन लातूर शहर महानगरपालिकेच्या सदस्या प्रेरणाताई होनराव यांनीशुक्रवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केले.पंतप्रधानरेंद्र मोदी यांनी नारी शक्ती वंदन अर्थात महिला आरक्षण विधेयक मंजूर करून घेण्यासाठी तीन दिवसांचे संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले होते. या अधिवेशनात काँग्रेसने या विधेयकासविरोध दर्शवला. परिणामतः हे विधेयक फेटाळले गेले. संसदेत या विधेयकाबाबत चालू असलेली चर्चा आपण प्रेक्षक गॅलरीत बसून पाहिली , ऐकली असल्याचे सांगून प्रेरणा होनराव म्हणाल्या की, हे विधेयक फेटाळले गेले तो दिवस असंख्यमहिला भगिनींच्या दृष्टीने दिवस ठरला. या विधेयकासकाँग्रेसच्या श्रीमती सोनिया गांधी, प्रियांका गांधी यांनी विरोध दर्शविला . लोकसभेचे विरोधी पक्षनेते असणाऱ्या राहुल गांधी यांनी तर या विधेयकाबद्दल ब्र शब्दही उच्चारला नाही. त्यांनी उलट आपल्या बालपणीच्या आठवणीना उजाळा देण्याचे काम केले. तर राज्यातील महिला काँग्रेस खासदारांनी या आरक्षणाची आवश्यकता नसल्याचे बोलून दाखविल्याचे ऐकून आपणास आश्र्चर्य वाटल्याचे होनराव म्हणाल्या.पंतप्रधान नरेंद्र मोदींना या विशेष अधिवेशनात हे विधेयक मंजूर करून घेऊन येणाऱ्या २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये महिलांनाही संसद- विधिमंडळात ३३ टक्के आरक्षणा देऊन नारीशक्तीचा सन्मान करायचा होता. या विधेयकाचा लाभ देशातील सर्वच राजकीय पक्षात कार्यरत असणाऱ्या आमच्या महिला भगिनींना होणार आहे. महिलांचा हक्क दवाळण्याचाप्रयत्न या माध्यमातून झाला असला तरी आपण महिलांच्या हक्कासाठी येणाऱ्या काळात झगडत राहू.वर्ष २०२७ सालचा विकसित भारत महिलांच्या हक्क व अधिकारांनीपरिपूर्ण असलेला पाहायला मिळेल,असा विश्र्वासही प्रेरणा होनराव यांनी व्यक्त केला. २०११ सालच्या जनगणनेनुसार हे विधेयक मंजूर करून घेऊन येणाऱ्या २०२९ च्या निवडणुकीपासून माता - भगिनींना त्यांचे हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न पंतप्रधान मोदींनी केला. मतदार संघांची पुनर्रचना होऊन या विधेयकामुळे सर्वसामान्यांना समसमान लोकप्रतिनिधी मिळणार आहेत. येणाऱ्या काळात यासाठी भाजप आंदोलन करणार असल्याचे प्रेरणा होनराव यांनी नमूद केले.लातूर शहर जिल्हा महिला भाजपच्या अध्यक्षा शीतल मालू, सरचिटणीस रागिणी यादव यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी नगरसेविका शोभा मिरचे, स्वाती घोरपडे, जयश्री मोतीपवळे , चावले, शोभा कोंडेकर यांची उपस्थिती होती.

## लातुरात 'गो सन्मान आवाहन अभियान'चे आयोजन



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** भारतीय संस्कृतीचा मानबिंदू व प्राण मानली जाणारी गाय, ज्याला 'गोमाता' म्हणूनही ओळखले जाते. गोमातेला राष्ट्रमातेचा संवैधानिक दर्जा मिळावा आणि गोवंश हत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी या प्रमुख उद्देशाने देशभरात २७ एप्रिल रोजी व्यापक स्वरूपात 'गो सन्मान आवाहन अभियान' राबविण्यात येणार आहे.

या अभियानाअंतर्गत देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती, मुख्यमंत्री व राज्यपाल यांना तहसीलदारामार्फत हजारो गोभक्तांच्या स्वाक्षरीसह निवेदन सादर करण्यात येणार आहे. या पार्श्र्वभूमीवर लातूर येथे आहेत. आयोजित गोभक्तांच्या बैठकीत निश्र्चित करण्यात आले. गो संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन दिंडीच्या स्वागतासाठी शहरातील प्रमुख रस्त्यांवर बॅनर्स लावण्यात येणार असून, सहभागी होणाऱ्या गोभक्तांसाठी विविध ठिकाणी शीतपेयाची व्यवस्था करण्यात येणार आहे. दि. २७ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता येथील हनुमान चौक येथून 'गो सन्मान दिंडी'ची सुरुवात होणार आहे. या दिंडीत लातूरातील अनेक साधू-संत, कीर्तनकार तसेच टाळकरी मंडळी, महिला मंडळे भजन-कीर्तनाच्या माध्यमातून सहभाग नोंदविणार आहेत. गोमातेच्या सन्मानार्थ विविध घोषवाक्यांचे फलक हे दिंडीचे प्रमुख आकर्षण ठरणार ही दिंडी हनुमान चौक, महात्मा गांधी चौक, मेन रोड, लोकमान्य टिळक चौक मार्गे तहसील कार्यालयात विसर्जित होईल. येथे उपस्थित गोभक्त व साधुमंडळी हजारो स्वाक्षरींसह निवेदन तहसीलदार यांना सादर करतील. या भव्य 'गो सेवा-गो सुरक्षा-गो सन्मान' अभियानात लातूर शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन गोभक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच, दिंडीत सहभागी होणाऱ्या नागरिकांनी पांढरा गणवेश परिधान करावा, अशी माहिती या अभियानाचे प्रसिद्धी प्रमुख राजेश डुंगरवाल यांनी दिली.

## महापालिकेची मान्सूनपूर्व नालेसफाई मोहीम



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लातूर शहर महानगरपालिका, स्वच्छता विभागामार्फत दि. ५ एप्रिलपासून शहरातील मान्-सूनपुर्व नाले सफाई मोहीम सुरू करण्यात आली असून शहरातील मोठे व छोटे नाले जेसीबीमार्फत साफ करुन कचरा उचलून घेण्याची कार्यवाही चालू आहे. आजतागायत ४ मोठे नाले व २० छोटे नाले जेसीबीमार्फत साफ करण्यात आले आहे.

तसेच दि. २३ एप्रिल रोजी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे यांनी मान्सून पुर्व नाले सफाईच्या कामाची पाहणी प्रभाग क्रमांक ४ मधील इस्लामपुरा झोपडपट्टी तसेच इस्लामपुरा काझी यांच्या शेतातील कच्चा नाला व रिंग रोड, सम्राट चौक, डि-मार्ट परीसराची पाहणी केली. पाहणी दरम्यान मान्सून पुर्व नाले सफाई करावयाच्या उपाय योजनेबाबत संबंधीताना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

## वृक्ष लागवड करून डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अस्थींचे विसर्जन



तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर-चे अध्यक्ष तथा माजी राज्यसभा सदस्य शिक्षण तज्ज्ञ, थोर विचारवंत डॉ. गोपाळराव पाटील यांचे दि. २१ एप्रिल रोजी निधन झाले. येथील जिजामाता कन्या प्रशालेत दि. २३ एप्रिल रोजी त्यांच्या अस्थींचे विसर्जन वटवृक्षाचे रोपण करून करण्यात आले.

स्व.डॉ.गोपाळराव पाटील यांचे शैक्षणिक, सामाजिक, वैद्यकीय व राजकीय क्षेत्रात अमूल्य योगदान जिजामाता कम्प्रमुला, चातूर संत तुकाराम नॅशनल स्कूलमध्येही वृक्षारोपण संस्थेच्या संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूलच्या क्रीडा संकुलातही मान्यवरांच्या हस्ते डॉ. गोपाळराव पाटील त्यांच्या अस्थींचे विसर्जन वटवृक्षाचे रोपण करून करण्यात आले. यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य व मान्यवर उपस्थित होते. होते. त्यांचे कार्य समाजासाठी दिशादर्शक राहिले आहे. शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या जिजामाता कन्या प्रशालेत डॉ. गोपाळराव पाटील यांच्या स्मरणार्थ वट वृक्षाचे रोपण करून त्यांच्या अस्ति व रक्षा यांचे जमिनीत विसर्जन करण्यात आले. या वटवृक्षाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाच्या संदेशाबरोबरच डॉ. गोपाळराव पाटील यांचे स्मरण व त्यांच्या कार्याची प्रेरणा सतत मिळत राहील यासाठी असा अनोखा उपक्रम प्रशालेच्या वतीने राबविण्यात आला. प्रशालेच्या विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत प्रशालेचे पर्यवेक्षक संतोष गुरव यांच्या हस्ते प्रशालेच्या प्रांगणात वटवृक्षाचे रोपण करून डॉ. गोपाळराव पाटील यांच्या अस्थी व रक्षा यांचे विसर्जन करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## वैद्यकीय-इंजिनिअरिंग पलीकडेही करिअरच्या संधी

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** जेएस-पीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या वतीने दहावी व बारावी वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी शिक्षणातील करिअर संधींसह इतर विविध क्षेत्रांतील करिअर संधींबाबत विशेष मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य गोविंद शिंदे यांनी शाळेच्या वतीने संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांना विविध नवीन विद्याशाखांची ओळख करून देत त्या माध्यमातून करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी नियमित मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून पितांबरे आयएस इन्स्टिट्यूटचे संचालक प्रीतम पितांबरे यांनी विद्यार्थ्यांना वैद्यकीय व अभियांत्रिकी शिक्षणासोबतच एमपीएससी आणि यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांद्वारे प्रशासकीय सेवेत प्रवेश करण्याच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

## खरा विकास काय असतो हे भाजपाने दाखवून दिले

तभा वृत्तसेवा

**लातूर दि. २४ एप्रिल :** लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्यानंतर रेणापूर तालुका पोरका झाला होता. गेल्या पंधरा वर्षात काँग्रेसच्या कार्यकाळात विकास शोधावा लागत होता मात्र केंद्रात, राज्यात परिवर्तन झाले आणि ग्रामीण भागात खरा विकास काय असतो हे विविध योजनेच्या माध्यमातून भाजपाच्या नेतृत्वातील सरकारने दाखवून दिले असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

केंद्रीय निधी योजनेअंतर्गत रेणापूर तालुक्यातील कारेपुर सय्यदपूर धवेली कवठाळी आनंदवाडी ते राज्य रस्ता दरम्यानच्या २५ कोटी रुपये खर्चाच्या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन लातूर ग्रामीणचे आमदार रमेशअप्पा कराड यांच्या शुभ हस्ते गुरुवारी सायंकाळी मौजे सय्यदपुर येथे झाले. यावेळी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कार्यकर्ते बळीराम चप्पे हे होते. याप्रसंगी माजी आमदार त्रिंबकनाना भिसे, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिपच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्या गोडभरले, रेणापूर पंस सभापती सौ. मोनिका सुर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभाताई अकनगिरे, जिप सदस्य महादेव साळुंके, पद्माकर चिंचोलकर, पंस सदस्या सौ. अंजली काळे,



सौ. शितल राऊतराव भाजपाचे ओमप्रकाश गोडभरले, भागवत सोट, अनिल भिसे, सुरज शिंदे, सुकेश भंडारे, अॅड. दशरथ सरवदे, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांची प्रमुख उपस्थिती होती.

कारेपूर ते आनंदवाडी या दरम्यानच्या रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाल्याने जनतेच्या मागणीमुळे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून निधी उपलब्ध करून रस्त्याच्या कामाचा आज प्रत्यक्षात शुभारंभ होतोय, तेही अठरा फुटाचा डांबरीकरणाचा रस्ता दर्जेदार होत असल्याचा मनस्वी आनंद होत असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गेल्या पंधरा वर्षात काँग्रेस वाल्यांनी मुरूमाचे एकही टोपलं टाकलं नाही. काँग्रेसच्या काळात विकासाची कामे शोधावी लागत होती मात्र शासनाच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात मोठ्या प्रमाणात विकास कामासाठी निधी आणण्यात यश आले याचे मोठे समाधान आहे.

NOTICE

NJ MUTUAL FUND
BUILT ON RULES

Unaudited Half Yearly Financial Results of the Schemes of NJ Mutual Fund ("the Fund") for the half year ended March 31, 2026

Investors may note that in accordance with Regulation 59 of the SEBI (Mutual Funds) Regulations, 1996, read with SEBI circulars issued in this regard from time to time, the unaudited half-yearly financial results of the schemes of NJ Mutual Fund for the half year ended March 31, 2026, has been hosted on the website of the Fund i.e www.njmutualfund.com in a user-friendly and downloadable format (spreadsheet) and on the website of Association of Mutual Funds in India ("AMFI") i.e. www.amfiindia.com.

For NJ Asset Management Private Limited
Investment Manager of NJ Mutual Fund
Sd/-
Vineet Nayyar
Director & Chief Executive Officer
(DIN: 10690316)

Date: April 24, 2026
Place: Mumbai

For further details, please contact: NJ Asset Management Private Limited (CIN U67100GJ2005PTC046959) Registered office: Block no. 601, 3rd floor, C Tower, Udhna Udyognagar Sangh Commercial Complex, Central Road No.10, Udhna, Surat - 394210. Gujarat. Telephone Number – 0261 6715601. Corporate office: Unit no. 101A, 1st floor, Hallmark Business Plaza, Bandra (East), Mumbai – 400051. Telephone number: 022 68940000 /1860 500 2888 / 040-49763510. Email id: customercare@njmutualfund.com Website: www.njmutualfund.com

MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.

तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### डॉ. रामेश्वर नाईक यांना 'अनसंग हिरो' अवॉर्ड जाहीर : १ मे रोजी पुरस्कार वितरण

**परभणी,/प्रतिनिधी-** आर्ट ऑफ लिविंग संस्थेला ४५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल तसेच श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या जन्मदिनानिमित्त प्रदान करण्यात येत असलेला आर्ट ऑफ लिविंग अनसंग एव्हरीडे हिरोज अवार्ड पुरस्कारासाठी परभणी येथील डॉ. रामेश्वर ज्ञानोबाराव नाईक यांची निवड करण्यात आली आहे. याबाबतचे पत्र आर्ट ऑफ लिविंग संस्थेच्या वतीने देण्यात आले.

मानवी मूल्य, अध्यात्म, सामाजिक बांधिलकी आणि नि:स्वार्थ सेवेला प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा सम्मान व्हावा, तसेच डॉ. नाईक यांच्या नि:स्वार्थ आणि समाज परिवर्तन घडवून आणणाऱ्या कार्याची दखल घेऊन या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. नाईक यांच्या कार्यामुळे अनेकांचे जीवन समृद्ध झाले आहे. परंतु हे योगदान अनेकदा सार्वजनिक पातळीवर फारसे अधोरेखित होत नाही. समाजातील मान्यवर, विचारवंत आणि विविध क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीत शुक्रवार १ मे रोजी सायंकाळी ५ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनियरिंग येथे हा पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

आर्ट ऑफ लिविंग संस्थेचा सन्मानाचा आणि अनसंग एवरीडे हिरोज अवार्ड जाहीर झाल्याबद्दल डॉ. नाईक यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### सेलूत नरसिंह जन्मोत्सवास मोठ्या उत्साहात सुरुवात
### पांडे गल्लीतील प्राचीन नरसिंह मंदिरात २२ एप्रिल ते ३ मे या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरातील पांडे गल्ली येथील अत्यंत प्राचीन नरसिंह मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाही नरसिंह जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. भगवान विष्णूंच्या दशावतारांपैकी चौथा अवतार मानला जाणारा नरसिंह अवतार भक्तांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे.

पुराणानुसार, भक्त प्रल्हाद संकटात सापडल्यावर भगवान विष्णूंनी खांबातून प्रकट होऊन नरसिंह रूप धारण केले. अर्धमानव व अर्धसिंह असे स्वरूप असल्यामुळे या अवताराला 'नरसिंह' असे संबोधले जाते. भक्तांच्या रक्षणासाठी तत्पर धावून जाणारा हा अवतार असल्याने नरसिंह जन्मोत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

यंदाचा जन्मोत्सव २२ एप्रिल ते ३ मे या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. या काळात दररोज सकाळी मूर्तीचे अभिषेक, पूजा व आरती होणार असून रात्री ८ वाजता गुरुवार पाठ मंडळाच्या वतीने गणपती अथर्वशीर्ष, भगवद्गीतेतील अध्याय, रामरक्षा व विष्णुसहस्रनामाचे पठण करण्यात येणार आहे.

दि. ३० एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता वेदमूर्ती तथा भागवताचार्य नागनाथराव जोशी (विडोळीकर) यांच्या प्रवचनातून नरसिंह जन्म अध्यायाचे निरूपण होईल. त्यानंतर रात्री साडेनऊ वाजता श्रींची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.

दि. १ मे रोजी दुपारी १ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून दि. २ मे रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत ङ्गपिठलं-भाकरफ प्रसादाचे वितरण होणार आहे. दि. ३ मे रोजी प्रक्षाळ पूजेनंतर कार्यक्रमाची सांगता होईल. त्यानंतर रात्री ९ वाजता गुरुवार पाठ मंडळाच्या वतीने त्रिपदी व विडा भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानचे पुजारी अनंत पाटील, केशव पाटील, नारायण पाटील व देविदास पाटील यांनी केले आहे.

### लिपणे आर्थोपेडिक हॉस्पिटल अॅन्ड ट्रामा केअर सेंटरचा उद्या उद्घाटन सोहळा

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील डॉक्टरलेन भागातील धानोरकर हॉस्पिटलजवळील लिपणे आर्थोपेडिक हॉस्पिटल अॅन्ड ट्रामा केअर सेंटरचा शुक्रवार २४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सोहळा होणार आहे.

मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. वेदप्रकाश पाटील यांच्याहस्ते व डॉ. दत्तात्रय मगर, डॉ. उत्तमराव वानखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटनाचा सोहळा होणार आहे, अशी माहिती या हॉस्पिटलचे डॉ. कैलास काशिनाथराव लिपणे, सौ. पुजा कैलास लिपणे (जालना) यांनी दिली.

या हॉस्पिटलच्या माध्यमातून हाडे व सांधे तपासणी व उपचार, फ्रॅक्चर उपचार, अपघाती दुखापतीचे उपचार, प्लास्टर सुविधा, गुडघा, कुला व इतर सांधे बदल शस्त्रक्रिया, गुडघेदुखी उपचार, कंबरदुखी व मानदुखी उपचार, आर्थोस्कोपी, स्पाईन/कणा विकाराचे उपचार, लिगामेंट व मांसपेशी दुखापत उपचार, खेळाडूंच्या दुखापतीचे उपचार, ऑस्टिओपोरोसिस उपचार, संधीवात, सांधेदुखी व सूज उपचार, बाल आर्थोपेडिक उपचार, शस्त्रक्रियेनंतर पुनर्वसन व सल्ला, फिजिओथेरपी व व्यायाम मार्गदर्शन, एक्सरे व आवश्यक तपासणी सल्ला वगैरे सुविधा उपलब्ध असणारे आहेत, अशी माहिती डॉ. लिपणे दाम्पत्यांनी दिली.

### नांदेड-हडपसर गाडी पूर्ववत पुण्यापर्यंत सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार - खासदार रामराव वडकूते यांचे आश्वासन

**परभणी,/प्रतिनिधी :** नांदेड-पुणे रेल्वेगाडी हडपसरपर्यंत मर्यादित केल्यामुळे मराठवाड्यातील प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. ही गाडी पूर्ववत पुण्यापर्यंत सुरू करण्यासाठी रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन राज्यसभेचे नवनिर्वाचित खासदार रामराव वडकूते यांनी मराठवाडा रेल्वे प्रवासी महासंघाला दिले.

ज्येष्ठ पत्रकार दिलीप दीक्षित यांच्या निवासस्थानी मराठवाडा प्रवासी महासंघाच्या वतीने खासदार वडकूते यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी मराठवाडा प्रवासी महासंघाचे अरुण मेघराज, प्रा. सुरेश नाईकवाडे, दयानंद दीक्षित, खदीरलाला हाश्मी आदी उपस्थित होते.

यावेळी रेल्वे समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, प्रवासी महासंघाने विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनात नांदेड-हडपसर रेल्वेगाडी पूर्वीप्रमाणे पुणे किंवा पनवेलपर्यंत वाढविण्याची मागणी करण्यात आली. तसेच जनशताब्दीप्रमाणे हिंगोली-मुंबई दरम्यान रात्रीच्या वेळेत नवीन दैनंदिन एक्सप्रेस सुरू करावी, कोरोनाकाळात बंद करण्यात आलेली संभाजीनगर-नांदेड दैनंदिन एक्सप्रेस पुन्हा सुरू करावी, अमरावती-पुणे आणि नागपूर-कोल्हापूर साप्ताहिक गाड्या दररोज धावाव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

याशिवाय रायलसीमा एक्सप्रेसला अतिरिक्त डबा जोडून ती जालना पर्यंत वाढवावी, मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश या मागासलेल्या प्रदेशांच्या विकासासाठी स्वतंत्र रेल्वे झोन स्थापन करावा, तसेच परभणी रेल्वे स्थानकावर ४ व ५ क्रमांकाचे नवीन प्लॅटफॉर्म उभारावेत, अशा विविध मागण्या करण्यात आल्या.

# विकास कामांना गती द्या प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा-पालकमंत्री
# जिंतूर येथे विकास कामाची आढावा बैठक संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी-** विकास कामांना गती द्या प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर साकोरे जिंतूर येथे विकास कामाची आढावा बैठक जिंतूर जिंतूर सेलु विकास कामाची पालकमंत्री मेघना दीदी बोर्डीकर यांनी घेतली आढावा बैठक यामध्ये नगरपरिषद महसूल ग्रामविकास जलसंपदा उद्योग ऊर्जा सार्वजनिक बांधकाम आरोग्य शिक्षण सुरू असलेल्या व प्रलंबित कामाची सविस्तर माहिती घेऊन विलंब होऊ देऊ नका विकास कामांना गती द्या अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

जिंतूर येथे पोद्दार बोर्डीकर इंग्लिश स्कूल आयोजित आढावा बैठक यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष लता विजयकुमार वाकळे जिंतूर चे नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख जिल्हाधिकारी संजय सिंग चव्हाण मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नीतीशा माथुरा निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी सहाय्यक पोलीस अधीक्षक जीवन बेनीवाल उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यासह विविध विभागाचे अधिकारी जिंतूरच्या तहसीलदार शितल कचवे नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते बैठकीच्या प्रारंभी शेलू नगरपरिषद व जिंतूर नगरपरिषद विविध नागरी समस्या चा सविस्तर आढावा



घेण्यात आला शहरातील घनकचरा व्यवस्थापना अधिक परिणाम करण्यासाठी उपायोजना पिण्याच्या पाण्यासाठी पुरवठा दीर्घकालीन करण्यासाठी घरकुल योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी नाट्यगृह व प्रशासकीय इमारत स्थिती एसटीपी प्लॅटची कार्यक्षमता व क्रीडांगण उभारणी व देखभाल सार्वजनिक सार्वजनिक प्रणाली अंतर्गत धान्य यासंबंधी माहिती सादर करण्यात आली यासंबंधी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमित करण्याबाबतची कारवाई व एन एच १६ पारवाआसोला या परभणी शहर वळण रस्ता चाबू संबंधाचा आढावा घेण्यात आला यावेळी महसूल विभागाच्या कामाची विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले दोन्ही तालुक्यातील पांदण रस्त्याची महाराजस्तव अभियानाची प्रगती टंचाई परिस्थिती आढावा संजय गांधी निराधार योजने प्रलंबित प्रश्न मानसून पूर्वतयारी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आली लाडकी बहीण व लखपती दीदी योजनेच्या लाभार्थींची किती व अंमलबजावणी योजनेचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा भर देण्यात आला.

तसेच जिंतूर येथील येलदरी धरणातील पाणी वितरण व्यवस्था उद्योग क्षेत्रातील स्थिती महावितरण सेवा आरोग्य सेवा विभागाचा आढावा घेण्यात आला यावेळी पालकमंत्र्यांनी स्पष्ट सूचना दिल्या विकास कामे व अनावश्यक कामेकी प्रलंबित ठेवु नये अडथळे येत असेल ते तात्काळ वरिष्ठांना सांगावे व त्यावर त्वरित उपाययोजना कराव्यात पाणीपुरवठा व त्यांचा व्यवस्थापना प्राधान्य देण्यात व मानसून पूर्वतयारी वेळेत पूर्ण करावी शासकीय योजनेचा लाभ पात्र लाभार्थी पर्यंत पोहोचण्यात यावा या राव बैठकीत पालकमंत्र्यांनी स्पष्ट अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की कामे वेळेत पूर्ण करावी व कुठले अडथळे येऊ नये अशा सूचना देण्यात आले आहेत.

### परभणी पोलिस यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी कटिबद्ध - पालकमंत्री
### परभणी पोलिसांच्या ३१ वाहनांचे लोकार्पण

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा अधिक सक्षम, गतिमान आणि परिणामकारक करण्यासाठी पालकमंत्री म्हणून कटिबद्ध आहे, अशी ग्वाही पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली.

परभणी पोलीस मुख्यालयात उभारलेल्या 'सद्रक्षणगड' किल्ल्याचे उद्घाटन तसेच नव्याने कार्यान्वित करण्यात आलेल्या पोलीस वाहनांचे लोकार्पण गुरुवार २३ एप्रिल रोजी सकाळी १०.२० वाजता पालकमंत्री बोर्डीकर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता वाकळे, महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथूर, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना पालकमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, जिल्हा वार्षिक योजनेतून पोलिस विभागाला देण्यात आलेल्या ३१ नवीन वाहनांमुळे गस्त वाढेल, प्रतिसादाचा वेळ कमी होईल आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची क्षमता अधिक बळकट होईल. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास पालकमंत्री बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

## गौर येथील मारहाण प्रकरणातील चार आरोपी नांदेडहून अटकेत : न्यायालयाने सूनावली पोलिस कोठडी

**पूर्णा,/प्रतिनिधी-** : तालुक्यातील गौर येथे वाढदिवसाच्या कार्यक्रमातून निर्माण झालेल्या किरकोळ वादाने हिंसक रूप धारण केल्याच्या प्रकरणात फरार असलेल्या चार आरोपींना चुडावा पोलिसांनी नांदेड येथून अटक केली आहे. अटक आरोपींना पूर्णा न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली.

१७ एप्रिल रोजी गौर गावातील मातंग समाज मंदिराजवळ रस्त्यावर दुचाकी आडवी लावून वाढदिवस साजरा करताना दोन गटांमध्ये वाद झाला होता. या वादात संतोष बालाजी सावळे व सुजित बालाजी सावळे यांनी धारदार शस्त्राने गोरखनाथ पारवे यांच्यावर हल्ला करून त्यांच्या पोटात वार केल्याने ते गंभीर जखमी झाले. तसेच इतर आरोपींनी मारहाण व शिवीगाळ केल्याची घटना घडली. या घटनेनंतर संतप्त जमावाने दोन वाहनांना आग लावली होती.

या प्रकरणी १८ एप्रिल रोजी चुडावा पोलीस ठाण्यात सुशिल उर्फ काली केशव पारवे यांच्या फिर्यादीवरून पाच जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर सर्व आरोपी फरार झाले होते.

पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ आणि उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे वेगाने फिरवण्यात आली. सपोनि सुशांत किनगे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तांत्रिक व स्थानिक माहितीच्या आधारे नांदेड येथे छापा टाकून संतोष बालाजी सावळे, सुजित बालाजी सावळे, बालाजी संभाजी सावळे व योगेश चांदू आंभोरे या चौघांना अटक केली. अटक आरोपींना पूर्णा न्यायालयात हजर केले असता त्यांना पोलीस कोठडी सुनावण्यात आली असून पुढील तपास चुडावा पोलीस करीत आहेत.

## पूर्णेचे ग्रामीण रुग्णालय म्हणजे निव्वळ रेफर सेंटर.. वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून कर्मचाऱ्यांचा वाणवा : बहुतांशी रुग्णांना दाखवली जाते परभणी किंवा नांदेडची वाट

**पूर्णा,/प्रतिनिधी-:** ज्याच्या आरोग्य विभागाने कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या पूर्णेतील ग्रामीण रुग्णालय हे केवळ अनागोदी कारभारामुळे निव्वळ रेफर सेंटर म्हणुन ओळखले जावू लागले आहे.

राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या जिल्ह्यात पूर्णा येथील ग्रामीण रुग्णालयांतर्गत दैनंदिन अनागोदी कारभार व रुग्णांची दररोज होणारी हेळसांड या संबंधीचे अनेक किस्से आहेत. रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आहेत. परंतु, यातील बहुतांशी वैद्यकीय अधिकारी केवळ हजेरी लावण्यापुरतेच आहेत. एखादा दुसराच वैद्यकीय अधिकारी इनामे इतबारे ड्युटी बजावत आला आहे. परंतु, शहरी व ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांची तपासणी अन् मोफत सल्ला देऊन त्यास नांदेड किंवा परभणीच्या शासकीय रुग्णालय किंवा खाजगी रुग्णालयात रेफर करण्याचे काम इनामे इतबारे सुरु आहे.

तहसील कार्यालयाच्या इमारतीसमोर राज्य सरकारने कोट्यवधी रुपये खर्चून ग्रामीण रुग्णालयाकरीता सुंदर अशी इमारत उभी केली. कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थानेही उभारली. परंतु, या रुग्णालयात मोठ्या प्रमाणावर अधिकारी-कर्मचाऱ्यांचा स्टाफ असतांना सुध्दा रुग्णांना कोणत्याही पुरेशा सुविधा उपलब्ध नाहीत. सर्वसामान्य रुग्णांची केवळ तपासणी आणि मोफत सल्ला या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही वैद्यकीय सुविधा मिळत नाहीत. या रुग्णालयात सोनोग्राफीचीही सुविधा उपलब्ध नाही. अस्वस्थ रुग्णांकरीता व्हेंटीलेटर वगैरे सुविधा तर कोसोदूर राहील्या, असे विदारक चित्र आहे.

सामाजिक कार्यकर्ते राज नारायणकर यांनी जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या आरोग्यमंत्री सौ. साकोरे यांना या संदर्भातील विदारक चित्र निदर्शनास आणून दिले. हे रुग्णालय केवळ रेफर सेंटरच ठरले आहे, असे नमूद केले. या रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी नेहमी उपलब्ध होत नाहीत. कर्मचारीही दांडी मारण्यात तरबेज आहेत. बहुतांशी मंडळी परभणी, नांदेड, हिंगोली येथून अपडाऊन करीत आले आहेत. रुग्णांना सोनोग्राफी असो, सिटीस्कॅन किंवा व्हेंटीलेटर वगैरे गोष्टींचाही वाणवाच आहे. औषधींचाही पुरेसा साठा नाही. या संदर्भात रुग्णांमधून सातत्याने तक्रारी होवूनसुध्दा कोणीही लक्ष घालत नाही, अशी खंत व्यक्त करतेवेळी या रुग्णालयांतर्गत संपूर्ण कारभार सुधारावा व रुग्णांना मोठा दिलासा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

### समानतेच्या विचारांमुळेच देश प्रगतीच्या मार्गावर - जिल्हाधिकारी

**परभणी,/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे विद्वान असून त्यांनी देशहित डोळ्यासमोर ठेवून तळागाळातील समाजाला समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी अथक प्रयत्न केले आणि देशाला उत्कृष्ट असे संविधान दिले, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सोनपेठात आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलिस अधिक्षक रवींद्रसिंह परदेशी, तहसीलदार सुनील कावरखे, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्रीकांत विटेकर, नगराध्यक्ष परमेश्वर कदम, माजी नगराध्यक्ष चंद्रकांत राठोड, पोलीस निरीक्षक अशोक गित्ते, प्रा. डॉ. साहेबराव सोनसळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलतांना जिल्हाधिकारी चव्हाण म्हणाले, डॉ. आंबेडकर यांच्या उच्च शिक्षणासाठी सयाजीराव गायकवाड आणि छत्रपती शाहू महाराज यांनी आर्थिक सहकार्य केल्यामुळे त्यांना परदेशात शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शेतकरी, महिला आणि वंचित घटकांच्या हितासाठी बाबासाहेबांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.या कार्यक्रमास नगरसेवक बळीराम काटे, साजेद कुरेशी, विलास भाग्यवंत, महिला व बालकल्याण सभापती सृष्टी मुंढे, रामभाऊ नवले पाटील, माजी उपनगराध्यक्ष डिगांबर भाडुळे तसेच जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गौतम मुंढे, सचिव संभाजी रंजवे, उपाध्यक्ष माधव रंजवे, कोषाध्यक्ष धम्मापाल किरवले आदींसह महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिवताप आजार टाळण्यासाठी नागरीकांनी काळजी घ्यावी! महापालिकेच्यावतीने आवाहन 'डंक छोटा - धोका मोठा' मोहिमेला नागरिकांचा प्रतिसाद आवश्यक

**परभणी ,/प्रतिनिधी:** नागरिकांनी हिवताप आजार टाळण्यासाठी विविध उपाय योजना करून काळजी घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. भारतात हिवताप हा आजार अजूनही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर समस्या मानला जात असून, त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी शासन यंत्रणा आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

जागतिक आरोग्य संघटना यांच्या पुढाकारातून दरवर्षी २५ एप्रिल हा दिवस जागतिक हिवताप दिन म्हणून साजरा केला जातो. गेल्या काही दशकांमध्ये हिवताप निर्मूलनासाठी जागतिक स्तरावर विविध उपाययोजना राबविण्यात आल्या असून, त्याची जाणीव आणि जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. यंदाच्या वर्षाचे घोषवाक्य : . . असे असून, हिवताप निर्मूलनासाठी आता ठोस पावले उचलण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे.

हिवतापाचा प्रसार ॲनाफिलस जातीच्या मादी डासामार्फत होत असून, हा डास प्रामुख्याने स्वच्छ साठलेल्या पाण्यात वाढतो. बाधित व्यक्तीला चावल्यानंतर डासाच्या शरीरात हिवतापाचे जंतू विकसित होतात आणि त्यानंतर तोच डास निरोगी व्यक्तीला चावल्यास हे जंतू शरीरात प्रवेश करतात. हे जंतू यकृतामध्ये वाढून काही दिवसांनी रुग्णाला थंडी वाजून ताप येणे, घाम येणे, डोकेदुखी, उलट्या अशी लक्षणे दिसू लागतात.

हिवतापाचे निदान रक्त तपासणी किंवा तत्काळ निदान किटद्वारे करण्यात येते. कोणताही ताप हा हिवताप असू शकतो, त्यामुळे ताप आल्यास विलंब न करता नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात मोफत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. रुग्ण आढळल्यास वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार औषधोपचार त्वरित सुरू करणे आवश्यक आहे.

हिवतापाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी घराभोवती पाणी साचू न देणे, पाण्याचे साठे नियमित रिकामे करून झाकून ठेवणे, टाकाऊ वस्तूंची विल्हेवाट लावणे, झोपताना मच्छरदाणीचा वापर करणे, परिसर स्वच्छ ठेवणे, संध्याकाळी दारे-खिडक्या बंद ठेवणे तसेच कीटकनाशक फवारणी करून घेणे अशा उपाययोजना प्रभावी ठरतात. तसेच डासांची उत्पत्ती होईल असे कोणतेही वातावरण निर्माण होऊ नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

योग्य काळजी, स्वच्छता आणि वेळेवर उपचार यामुळे हिवतापावर नियंत्रण मिळवणे शक्य असून, यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करणे गरजेचे आहे. महापौर सय्यद इकबाल, उपमहापौर गणेश देशमुख, आयुक्त नितीन नार्वेकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. कल्पना सावंत आदींनी नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून हिवतापमुक्त शहरासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले आहे.

आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा.... ताप आल्यास त्वरित सरकारी दवाखान्यात दाखवावे. कोणताही ताप अंगावर काढू नये. या आजाराचे सर्वोत्तम निदान व उपचार सरकारी दवाखान्यांमध्ये मोफत आहे तरी याच्या जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत डासासाठी पोषक वातावरण निर्माण करू नका. वरील दक्षता प्रत्येकाने घेतल्यास डासाची उत्पत्ती होणार नाही व डास चावणार नाही. म्हणजे योग्य काळजी व वेळीच केलेला उपचार तुम्हाला होणाऱ्या आजारापासून दुर ठेवील त्यासाठी किटकजन्य आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्वांनी हातभार लावावा असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रावजी. एम. सोनवणे यांनी केले आहे....

## अग्रलेख...

# 'सामूहिकते'कडून 'वैयक्तिकते'कडे

शहरांच्या गजबजाटात एक दृश्य अलिकडे वारंवार दिसू लागले आहे. रस्त्यावरील आंदोलने, त्यामुळे ठप्प झालेली वाहतूक आणि त्या कोंडीत अडकलेला संतप्त नागरिक. मुंबईत अलिकडेच ते पाहावयास मिळाले. भारतीय जनता पार्टीच्या महिला कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. संसदेत महिला आरक्षणासंबंधीच्या एका घटनादुरुस्ती प्रस्तावास विरोधकांच्या इंडिया आघाडीने विरोध केल्यामुळे दोन तृतीयांश बहुमताचे संख्याबळ प्रस्तावाच्या बाजूने उभे करण्यात सत्तारूढ भाजपला यश आले नाही आणि तो प्रस्ताव नामंजूर झाला. विरोधकांचा निषेध करण्यासाठी महाराष्ट्रात भाजपप्रणीत महायुतीच्या वतीने जागोजागी आंदोलने करण्याचे स्वतः मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते. मुंबईतील या आंदोलनाला अनपेक्षित कारणामुळे वेगळेच वळण लागले. आंदोलनामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत अडकलेल्या एका महिलेने संतापाच्या भरात असंसदीय शब्दांचा वापर करत संतप्त प्रतिक्रिया दिली. व्यक्तिगत समस्येत वाहतूक कोंडीची भर पडल्यामुळे काहीशा त्रस्त झालेल्या त्या महिलेचा संताप रास्त असेलही, परंतु सार्वजनिक ठिकाणी एका महिलेकडून सरकार किंवा आंदोलनकर्त्यांबाबत उघडपणे व्यक्त होणाऱ्या विचारांची सभ्यता हा प्रश्न मात्र उरतोच. याआधी मुंबईत आणि इतरत्रही वेगवेगळ्या प्रश्नांवर तीव्र सामाजिक प्रतिक्रिया उमटल्या आहेत. प्रसंगी रस्त्यावर उतरून आपल्या भावनांना वाट करून देणे हा लोकशाहीने दिलेला सामाजिक हक्क आहेच. याआधी असे असंख्य मोर्चे, आंदोलने यामुळे वाहतूक कोंडीचा अनुभवही अनेकदा येतच होता आणि त्यामुळे होणाऱ्या गैरसोयींचादेखील मुंबईच्या जनजीवनाने अनेकदा अनुभव घेतलेला आहे. कोणत्याही समस्येबाबत जनतेचे किंवा सरकारांचे लक्ष वेधून घेण्यासाठी केली जाणारी आंदोलने ही समाज जागृत असल्याची लक्षणे असतात. त्यामुळे अशा आंदोलनांत प्रत्यक्षपणे सहभागी होणे किंवा सहभागी न होता आंदोलनकर्त्यांच्या भावना समजून घेत त्यास पाठिंबा देणे हे सजग समाजाचे कर्तव्यच मानले जाते. मात्र, रस्त्यावरील आंदोलनांच्या प्रदीर्घ इतिहासात बहुधा पहिल्यांदाच एका व्यक्तीने थेट रस्त्यावर उतरून आंदोलनाविषयीच व्यक्त केलेल्या निषेधाच्या भावनांमुळे आता या घटनेमागच्या काही पैलूंचा आढावा घेणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आंदोलनांची परंपरा जुनी आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या शहरांनी मोर्चे, बंद, रास्ता रोको या लोकशाही मार्गाने व्यक्त होणाऱ्या अभिव्यक्तीचे आविष्कार वारंवार अनुभवले आहेत. एकेकाळी अशा आंदोलनांकडे सहानुभूतीने पाहिले जात असे. कारण आंदोलन करणारे आणि त्रास सहन करणारे, दोघेही कुठल्या तरी व्यापक सामाजिक किंवा राजकीय उद्दिष्टाचे भागीदार असत. 'आपल्यासाठीच हा लढा' ही भावना त्या काळात ठळक होती. ही भावना काळासोबत बदलत गेली. कोणे एके काळी, मुंबईच्या रस्त्यांवरून गिरणी कामगारांचे लाखोंचे मोर्चे निघत असत. या मोर्चातील मागण्यांशी या वर्गापलीकडच्या समाजाचे तसे काहीच देणेघेणे नव्हते. तरीही गिरणी कामगार हा समाजाचाच एक घटक असल्याने त्याच्या अडचणीच्या काळात समाजही त्याच्यासोबत असल्याची भावना अशा अप्रत्यक्ष सहभागातून व्यक्त होत असे. उदारीकरणानंतर मात्र हे चित्र बदलत गेले आणि भारतातील समाजजीवनाची दिशादेखील बदलत गेली. वेग, स्पर्धा, वेळेचे महत्त्व या सर्वांचा मेळ घालत घड्याळाच्या काट्यासोबत धावण्याचा वेगवान स्पर्धेत शहरी जीवनशैली पुरती बदलली. रोजच्या धकाधकीत वेळेचे नियोजन हाच जीवनाचा केंद्रबिंदू बनला आणि समाजकेंद्रित जीवनशैली नकळत व्यक्तिकेंद्रित होऊ लागली. अशा परिस्थितीत, अचानक उभे राहणारे आंदोलन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीसारख्या समस्येचा विचार करताना, ती केवळ व्यक्तीच्या दैनंदिन आयुष्यावर परिणाम करणारी घटना आहे, असा विचार रुजत चालला आहे. त्यामागच्या सामूहिक भावनांचे महत्त्व कमी होत आहे. वस्तुतः, मुंबईत वाहतूक कोंडी ही काही अपवादात्मक स्थितीतच उद्‌भवणारी समस्या नाही. जवळपास रोजच मुंबईत आणि आता तर राज्यातील अन्य अनेक महानगरांत वा शहरांत ही समस्या उग्र होत आहे. अशा वेळी त्यात फसलेल्या ताटकळणाऱ्या माणसाला सहनशील राहावेच लागते. त्याच्या व्यक्तिगत समस्या कितीही तीव्र असल्या, तरी नेहमीच्या कोंडीत गुरफटल्यावर त्याला नाईलाजाने त्यास तोंड द्यावे लागते. आंदोलनांसारख्या कारणांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीला मात्र वेगळे रंग चिकटतात आणि जी समस्या सहसा सामाजिक जाणिवांच्या भावनेने समजून घेतली जाते, त्याचेही राजकारण सुरू होते. याच सामाजिक बदलत्या संदर्भात, मुंबईतील त्या आंदोलनामुळे झालेल्या वाहतूक कोंडीमुळे संतप्त होऊन थेट असंसदीय शब्दांत आंदोलकांवर-नेत्यांवर-पोलिसांवर शाब्दिक चिखलफेक करणाऱ्या त्या महिलेची भावनाही समजून घ्यावीच लागेल. कोणत्याही प्रश्नावर आंदोलन करण्याचा समाजाचा हक्क मान्य असला, तरी त्याची किंमत सामान्य नागरिकाने का मोजावी, हा प्रश्न आता अधिक तीव्रतेने पुढे येत असल्याचे हे लक्षण आहे. सरकारच्या वतीने या मोर्चाशी संबंधित असलेल्या नेत्यांनी याच जाणिवेने तिच्या संतप्त भावना समजून घेतल्या आणि या महिलेस सहन कराव्या लागलेल्या गैरसोयीबद्दल दिलगिरीदेखील व्यक्त केली. समाजाच्या जाणिवांबाबतचा असा समंजसपणा सहसा अभावानेच दाखविला जाण्याचा जमाना असताना, मंत्री गिरीश महाजन आणि मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी दिलगिरी व्यक्त करून त्या महिलेची माफीदेखील मागितली. पण प्रश्न तेवढ्यापुरताच मर्यादित नाही. या घटनेतून उमटणारा सामाजिक अन्वयार्थ अंतर्मुख करावयास लावणारा आहे. सामूहिक समस्यांचा सामना करताना संघटितपणे एकमेकांसोबत जाण्याची संस्कृती असलेला समाज 'सामूहिकते'कडून 'वैयक्तिकते'कडे सरकत आहे, असे ही घटना सांगते. पूर्वी व्यापक हितासाठी वैयक्तिक त्रास सहन करण्याची लोकांची तयारी होती; आता वैयक्तिक सोय आणि वेळ यांना प्राधान्य दिले जाते. ही बदलती प्राधान्ये आंदोलनांच्या स्वीकारार्हतेवर परिणाम करत आहेत. कोणताही राजकीय पक्ष असो किंवा सामाजिक, धार्मिक समाजसमूह असो, रस्ते अडवून, जनजीवन विस्कळीत करून लोकांचे लक्ष वेधून घेण्याची पारंपरिक पद्धत आता उलट परिणाम करू शकते, हा देखील या घटनेचा सांगावा. लोकांचे समर्थन मिळवण्याऐवजी त्यांचा रोष ओढवून घेण्याचा धोका वाढतो आहे. अशा रोषाची ताकद आंदोलनांहून अधिक असेल तर ते आंदोलनच लोकविरोधी ठरविले जाऊ शकते. त्याचा तोटादेखील होऊ शकतो.

भाजपने आयोजित केलेल्या या आंदोलनाच्या निमित्ताने आणखी काही बाबीदेखील समोर आल्या आहेत. अशा आंदोलनांकरिता रीतसर परवानगी घ्यावी लागते आणि परवानगी देणाऱ्या यंत्रणांना त्यानुसार मार्ग, वेळ, पर्याय यांचे नेमके नियोजन करावे लागते. आंदोलनांना परवानगी देताना, पर्यायी मार्गांची आखणी, वाहतूक व्यवस्थापन आणि नागरिकांना पूर्वसूचना या बाबी काटेकोरपणे राबवणे आवश्यक आहे. तसे करणे ही जबाबदारी संबंधित प्रशासकीय यंत्रणांना टाळता येत नाही. ते झाले नाही, तर मात्र लोकशाही हक्क आणि नागरिकांचे दैनंदिन हक्क यांच्यातील संघर्ष तीव्र होण्याचे प्रसंग निर्माण होऊ शकतात. भाजपच्या आंदोलनावेळी असेच काही झाले असेल, तर संबंधित यंत्रणांच्या जबाबदारीवर प्रश्नचिन्हे उमटणे अपरिहार्य आहे. आंदोलकांनी त्यासाठी समाजाची माफी मागितली आहे. संबंधित महिलेसमोर दिलगिरीही व्यक्त केली आहे. आता आयोजनातील त्रुटींबाबत संबंधित यंत्रणांना नेमका आढावा घ्यावा लागेल आणि तशा त्रुटी स्पष्ट झाल्यास त्याची जबाबदारीदेखील घ्यावी लागेल. असे केल्यास समाज आणि संबंधित यंत्रणा यांच्यातील परस्पर विश्वासाचे नाते अधिक मजबूत होण्यास मदतच होईल. कारण अशी कोणतीही घटना ही यापुढच्या काळात केवळ एका क्षणिक संतापाची नोंद असणार नाही. ती बदलत्या शहरी जीवनशैलीचे प्रतिबिंब असणार आहे. आंदोलनांची गरज आणि नागरिकांची सोय या दोन टोकांमध्ये संतुलन साधणे हे यापुढे मोठे आव्हान ठरणार आहे. हे संतुलन साधले नाही, तर आंदोलनांची धार बोथट होईल आणि समाज व व्यवस्था हाताळणाऱ्या यंत्रणा यांमधील दुरावा मात्र, नाहक वाढीस लागेल.

---

## अर्थविशेष

### हितेश पारसे

# नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटवस्तू करमुक्त की करपात्र?

भारतीय कुटुंब व्यवस्थेमध्ये 'भेट देणे' ही केवळ आर्थिक देवाणघेवाण नसून प्रेम, विश्वास आणि नात्यांची अभिव्यक्ती आहे. मुलांच्या शिक्षणासाठी पालकांकडून मदत, विवाहाच्या वेळी मिळणाऱ्या भेटी किंवा कुटुंबामध्ये मालमत्तेचे हस्तांतरण हे सर्व व्यवहार आपल्याला अगदी नैसर्गिक वाटतात. मात्र, आयकर कायद्याच्या दृष्टीने पाहिले तर ही बाब इतकी सोपी नाही. अनेक वेळा लोक 'घरगुती व्यवहार आहेत' या समजुतीतून दुर्लक्ष करतात आणि नंतर मोठ्या करदायित्वाला सामोरे जावे लागते. म्हणूनच 'निर्दिष्ट नातेवाईक' ही संकल्पना समजून घेणे अत्यावश्यक आहे.

'निर्दिष्ट नातेवाईक'- काय सांगतो आयकर कायदा?

आयकर कायद्याच्या कलम ५६(२)(X) नुसार, जर एखाद्या व्यक्तीला रोख रक्कम, दागिने, शेअर्स किंवा मालमत्ता भेट म्हणून मिळाली, तर ती रक्कम साधारणपणे 'इतर स्रोतांकडून मिळणारे उत्पन्न' म्हणून करपात्र ठरते. परंतु, यामध्ये एक महत्त्वाचा अपवाद आहे- जर ही भेट 'निर्दिष्ट नातेवाईक'कडून मिळाली असेल, तर ती पूर्णपणे करमुक्त असते, रक्कम कितीही असो.

**कोण आहेत हे 'निर्दिष्ट नातेवाईक'?**

कायद्यानुसार खालील नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींवर कर लागत नाही : पती किंवा पत्नी, आई-वडील, भाऊ-बहीण, मुलगा-मुलगी, सून-जावई, नातू-नात, तसेच आजी-आजोबा हे सर्व यात येतात. याशिवाय सासरे-सासू, तसेच आई-वडिलांच्या बाजूचे नाते- जसे काका, मामा, मावशी, आत्या- यांचाही यात समावेश आहे. म्हणजेच, या नातेवाईकांकडून मिळालेली भेट- ती रोख, ज्वेलरी किंवा प्रॉपर्टी असो- करमुक्त आहे.

**पण सर्व नातेवाईक यात येत नाहीत!**

इथेच सर्वांत मोठी चूक होते. चुलत भाऊ-बहीण, मित्र, दूरचे नातेवाईक किंवा व्यावसायिक संबंध- हे 'निर्दिष्ट नातेवाईक'मध्ये येत नाहीत. अशा व्यक्तीकडून एका वर्षात रु. ५०,००० पेक्षा जास्त भेट मिळाली, तर : संपूर्ण रक्कम करपात्र होते. ही बाब अनेकांना माहीत नसते आणि नंतर नोटीस येते.



**मालमत्ता व्यवहारात विशेष नियम**

प्रॉपर्टी व्यवहारात कर परिणाम अधिक गंभीर असतात. जर तुम्ही प्रॉपर्टी कमी किमतीत घेतली आणि तिची मुद्रांक शुल्क मूल्य जास्त असेल, तर त्या फरकावर आयकर लागू होतो. उदाहरणार्थ, रु. ६० लाख किमतीची प्रॉपर्टी रु. ४० लाखांत घेतली, तर रु. २० लाख हा फरक करपात्र ठरू शकतो- जोपर्यंत व्यवहार निर्दिष्ट नातेवाईक सोबत नाही.

**गिफ्ट डीड- का आणि कधी आवश्यक?**

कायद्याने प्रत्येक भेटीसाठी गिफ्ट डीड- आवश्यक नसले तरी प्रत्यक्षात ते अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रॉपर्टीच्या बाबतीत तर गिफ्ट डीड- आणि त्याची नोंदणी अनिवार्य आहे. रोख किंवा इतर भेटींमध्येही, मोठ्या रकमेच्या व्यवहारासाठी गिफ्ट डीड- केल्यास भविष्यातील कर वाद टाळता येतात. योग्य दस्तावेज नसल्यास आयकर विभाग व्यवहाराला 'उत्पन्न' किंवा 'कर्ज' मानू शकतो.

**क्लबिंग तरतुदी - दुर्लक्षित पण महत्त्वाचा मुद्दा**

भेट करमुक्त असली तरी त्यातून निर्माण होणारे उत्पन्न करमुक्त असेलच असे नाही. उदाहरणार्थ, पतीने पत्नीला पैसे दिले आणि त्या पैशातून व्याज किंवा नफा मिळाला, तर ते उत्पन्न पतीच्या नावावर करपात्र होऊ शकते. यामुळे 'कर नियोजन' करताना ही बाब लक्षात घेणे अत्यावश्यक आहे.

**सर्वसाधारण चुका**

- सर्व नातेवाईक करमुक्त आहेत असा गैरसमज
- गिफ्ट डीड न करणे, - रोख व्यवहार करणे
- कमी किमतीत प्रॉपर्टी व्यवहार करून कर दुर्लक्ष करणे
- आय. टी. आर. मध्ये योग्य प्रकटीकरण न करणे

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न**

१. मित्राकडून रु. १ लाख भेट मिळाली तर काय? रु. ५०,००० पेक्षा जास्त असल्याने पूर्ण रु. १ लाख करपात्र

२. वडिलांकडून रु. १० लाख मिळाले तर? पूर्णपणे करमुक्त, कारण ते निर्दिष्ट नातेवाईक आहेत

३. चुलत भावाकडून पैसे मिळाले तर? चुलत भाऊ हा निर्दिष्ट नातेवाईक नाही रु. ५०,००० पेक्षा जास्त असल्यास करपात्र

४. विवाहात मिळालेल्या भेटींवर कर लागतो का? नाही, विवाहाच्या वेळी मिळालेल्या सर्व भेटी करमुक्त

५. गिफ्ट डीड नसल्यास काय समस्या होऊ शकते? आयकर सूचना आल्यास स्रोत सिद्ध करणे कठीण. व्यवहार उत्पन्न म्हणून कर होऊ शकतो

६. मालमत्ता भेट केल्यास कर लागतो का? निर्दिष्ट नातेवाईकाकडून असल्यास करमुक्त. अन्यथा मुद्रांक शुल्क मूल्य लागू

७. पत्नीला पैसे दिल्यास कर लागतो का? भेट करमुक्त, पण त्यातून मिळणारे उत्पन्न पतीच्या नावावर कर होऊ शकते

**निष्कर्ष** : नातेवाईकांमधील व्यवहार हे भावनिक असले तरी आयकर कायद्यात ते अत्यंत तांत्रिक पद्धतीने पाहिले जातात. योग्य माहिती असल्यास आपण कायदेशीररीत्या कर वाचवू शकतो, परंतु चुकीची समजूत मोठ्या आर्थिक नुकसानीचे कारण ठरू शकते. त्यामुळे प्रत्येक व्यवहारापूर्वी एकच गोष्ट तपासा- 'ही व्यक्ती निर्दिष्ट नातेवाईक आहे का?'

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

---

## वेध

### प्रफुल्ल व्यास

# शाळा आणि अवकळा

गेल्या दोन दशकांत शिक्षण क्षेत्रात एक मोठा बदल घडत गेला आहे. गावातील जिल्हा परिषद शाळांपासून पालकांचा कल शहरात वा गावातील खाजगी शाळांकडे वळू लागला. खाजगी शाळांची चकाकी, इंग्रजी माध्यमाचा गवगवा, आधुनिक सुविधांमुळे त्या आकर्षण ठरत गेल्या. या सर्व घडामोडीत शिक्षणाचे मूळ ध्येय कुठेतरी हरवत चालले आहे. खाजगी शाळांची वाढ ही केवळ शिक्षणाच्या गरजेतून झाली नाही तर त्याला व्यावसायिकतेची किनार लागल्याचे वास्तव नाकारता येत नाही. 'शिक्षण' आणि 'सेवाभाव' हे सूत्र आता बदलून गेले आहे. प्रवेश फी, डोनेशन, वार्षिक शुल्क, वह्या-पुस्तकांचे बंडल, युनिफॉर्म, ट्रान्सपोर्टया खर्चाने सामान्य पालकांचे कंबरडे मोडते. त्या बदल्यात मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता तितकीच उच्च असते असे नाही. (त्याला काही शाळा नक्कीच अपवादही आहेत.) शाळाही आता पालकांसाठी 'स्टेटस' झाल्या आहेत. काही खाजगी शाळा आपले संस्कृतिमूल्य अबाधित ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहेत. विद्या भारतीसोबत संलग्न असलेल्या शाळांनी सेवाभाव जोपासला आहे. इंग्रजी म्हणजेच गुणवत्ता, असा एक गैरसमज पालकांच्या मनात पेरला गेला. व्हॅनने जाणारी लहान मुले हे आजचे सामान्य दृश्य झाले आहे.

जवळपास २५ वर्षांपूर्वी जिल्हा परिषदेच्या शाळांना उतरती कळा लागली होती. त्याकाळी धरून बांधून शिक्षक झालेले त्याला कारणीभूत होते. ते आता निवृत्त होत आहेत. आता 'गुरुजी'पासून 'सर' झालेल्या पिढीने चमत्कारिक बदल घडवलेला आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांनी कात टाकली आहे. 'मुख्यमंत्री माझी शाळा' अभियानात अनेक शाळांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. वर्धा जिल्ह्यातील एका जिल्हा परिषदेच्या एकाच शाळेतील तब्बल ९ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयात स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून निवड झाली आहे. वर्धा जिल्ह्यातील काही जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी इस्रोची सहल करून आले आहेत. पुढील वर्षीपासून राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थी 'नासा'त जातील असा विश्वास शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी भरघोस निधीचीही तरतूद केली आहे. मात्र, खाजगी शाळेतील काचेच्या लखलखत्या इमारतींना पाहून पालकाही बळी पडत आहेत. दुसरीकडे जि. प.च्या शाळांकडे अजूनही शासनाचे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष नाही. कोणत्याही गोष्टीत स्पर्धा असावी लागते. काही वर्षांपूर्वीपर्यंत जि. प.च्या शाळांना स्पर्धाच नव्हती. त्यामुळे खाजगी शाळांचे भाव वधारले होते. आता जि. प.च्या शाळांची परिस्थिती सुधरली आहे. पण, पालकांचा या शाळांवर विश्वास बसायला असून वेळ लागेल. त्यासाठी शिक्षकांनी स्वतःची मुलं, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, न. प.चे अधिकारी, डॉक्टर, इंजिनीअर, लोकप्रतिनिधींची मुलं, एकंदरीत सरसकट शासकीय अधिकाऱ्यांची मुलं जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्रवेश घेते होणार नाहीत तोपर्यंत सामान्य नागरिकांचा जि. प. शाळांवरचा विश्वास दृढ होणार नाही. शाळांच्या इमारतीही खाजगीच्या तुलनेत प्रशस्त कराव्या लागतील. काही ठिकाणी शिक्षक स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून शाळेचे रूपडे पालटताना दिसतात. मात्र, या सगळ्या सकारात्मक बदलांवर एक मोठी सावली आहे ती म्हणजे शिक्षकांवर लादले जाणारे अतिरिक्त काम. त्यामुळे जि. प.च्या शाळांतील शिक्षकांना शिकवायला वेळ कमी मिळतो. अनेक शाळांमध्ये आजही शिक्षकही नाहीत. अगदी गुरुवारचे ताजे उदाहरण घेतल्यास येत्या रविवारी शिष्यवृत्ती परीक्षा असल्याने जि. प.चा एक शिक्षक सकाळी शाळेत पोहोचला. गावातील विद्यार्थ्यांचा सराव घेऊन दुपारी जनगणनेच्या प्रशिक्षणासाठी गेला. शिक्षकांकडून करवून घेतली जाणारी कामे ही भारतीयत्वाचेच आहेत, यात शंका नाही. परंतु, विद्यादानाला त्यांना वेळ पुरेसा नाही. मात्र, ज्या शाळेत मुख्याध्यापक नाही त्या जि. प.च्या शाळा चांगल्या सुरू असल्याचा अनुभव अनेक शिक्षकांनी व्यक्त केला. अलिकडच्या काळात लोकप्रतिनिधी शाळांना शैक्षणिक साहित्य भेट देतात. परंतु, काही जि. प.च्या शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य धूळ खात पडले आहे. खाजगी शाळांच्या आकर्षक इमारती, स्मार्ट क्लासरूम, एसी बस, विविध ॲक्टिव्हिटीया सगळ्यांचा मोठा गाजावाजा केला जातो. पण शिक्षणाच्या गुणवत्तेचा मापदंड सुविधा ठरत नाहीत. खाजगी शाळा पूर्णपणे वाईट आणि जि. प.च्या शाळा पूर्णपणे चांगल्या असं सरसकट म्हणता येणार नाही. दाबून शिक्षण शुल्क घेणाऱ्या खाजगी शाळांवर नियंत्रणही ठेवण्याची गरज आहे. खाजगी शाळांमध्ये बालकांच्या शिक्षणाच्या हक्क अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. मात्र, त्याचे करोडोच्या घरात असलेले पैसे खाजगी शाळांना मिळालेच नाहीत. 'मार्क' आणि 'गुण' असाच फरक खाजगी 'शाळा' आणि 'शासकीय'मध्ये आहे. दोन्ही शाळांमधून देशाच्या उज्ज्वल भविष्याचा वेध घेणारे विद्यार्थी घडावे...

९८८१९०३७६५

---

## प्रासंगिक

### प्रा. डॉ. सुधाकर इंगळे

# संत रविदास समरसतेचे प्रतीक

भारतभूमीला संत परंपरेचा अमूल्य वारसा लाभलेला आहे. संत रविदास १४-१५ व्या शतकातील, भारतातील एक महान संत कवी व समाज सुधारक होते. १ फेब्रुवारी २६ ला त्यांचे ६५० वे जयंती वर्ष सुरू झाले आहे. हा दिवस केवळ जयंती साजरी करण्याचा नाही तर मानवतेचा, समतेचा, समरसतेचा पुनरुच्चार करण्याचा दिवस आहे. कारण आपण सर्व स्मरण करीत आहोत अशा मानवाचे जे संत रविदास, समरसतेचे जिवंत प्रतीक आहेत.

संत रविदास यांचा जन्म वाराणसी जवळील मांडुर या गावात झाला त्यांच्या आईचे नाव करमादेवी व वडील रघुराम. संत रविदास महाराज यांचा १ फेब्रुवारी हा दिवस जयंतीचा तर तिथीनुसार माघ पौर्णिमा. त्या काळात जन्मतारखेची नोंद केली जात नसे. त्यामुळे जन्मतारखेच्या बाबतीत मतभिन्नता आहे. संत करमदासजी यांनी संत रविदास यांचा जन्म माघ पौर्णिमा संवत १४३३ इसवी सन १३७६ निश्चित केलेला आहे. श्री रामचंद्र कुरील यांनी जन्म संवत १४७१ इसवी सन १४१४ निश्चित केला आहे. कारण त्यावर्षी माघ पौर्णिमेला रविवार आला आहे. परंतु चर्मकार संतांचे सांगण्यानुसार संत रविदासांची जन्मतिथी १४३३, माघ पौर्णिमा मानली जाते व त्या तिथीला रविदासांची जयंती साजरी केली जाते. संत करमदासजी यांनी याचा उल्लेख पुढील दोह्यात केला आहे.

**चौदासौ तैतीस की । माघ सुदी पंदरस।**
**दुखियन के कल्याण हित, प्रगटे श्री रविदास।**

या तिथीच्या आधारावर देशभरातील संत रविदास मंदिरांमध्ये, धार्मिक स्थळांवर दरवर्षी उत्सव साजरे केले जातात. संत रविदास यांनी विविध प्रदेशात भ्रमण केले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या भागात त्यांच्या नावाची विविध रूपे प्रचलित झालीत. रविदास, रेदास, रामदास, रोहिदास, रुद्रास, हरिदास इत्यादी. महाराष्ट्रात त्यांना रोहिदास तर प्रयाग परिसरात रेदास या नावाने ओळखले जाते. संत अभ्यासकांच्या मते त्यांचे मूळ नाव रविदास हेच आहे.

रविदासांचे आई, वडील व परिवारातील लोक सात्त्विक वृत्तीचे होते. अशा परिवारात, वातावरणात पालनपोषण झाल्याने त्यांचे मन भक्तिमार्गाकडे वळले. त्यांना भक्तीचे वेड लागले, त्यामुळे आई, वडील चिंताग्रस्त झाले. तेव्हा त्यांनी रविदासांना आपल्या वडिलोपार्जित व्यवसायाच्या कामात गुंतविले. परंतु रविदासाचे परमेश्वरभक्तीचे वेड कमी न होता वाढतच गेले. बालपणी रविदासांच्या विचारांना आकाराला होता. त्यामुळे उच्च-नीच, जात-पात विषमता या गोष्टी रविदासांना खटकू लागल्या होत्या.



वयाच्या तेराव्या वर्षी रविदास यांचा विवाह लोना नावाच्या मुलीशी झाला. पुढे त्यांना विजयदास नावाचा मुलगा झाला. रविदास गृहस्थ धर्मात होते. पण त्यांनी स्वार्थ कधीचाच सोडला होता. हाताने चप्पल बनवत असताना मुखाने रामनामाचा जप चालू असायचा. एखाद्या साधुसंताकडे पैसे नसतील तर रविदास फुकट चपलेचा जोड त्यांना देऊन टाकायचे .त्यामुळे संसार आणि व्यवसाय दोन्ही उघड्यावर येतील अशी परिस्थिती निर्माण झाली. रविदासांच्या वडिलांनी त्यांना घरातून काढून दिले. पण म्हणून रविदासांनी भक्तिमार्ग सोडून दिला नाही.

रविदास म्हणतात-

**अब कैसे छूटे राम नाम रट लागी।**
**प्रभु जी, तुम चंदन हम पानी जाकी, अंग अंग बास समानी।**
**प्रभु जी, तुम घन बन मोरा जैसे, चितवत चंद चकोरा।**
**प्रभुजी, तुम दीपक हम बाती जाकी, ज्योति बरे दीन राती।**
**प्रभुजी तुम मोती हम धागा, जैसे सोनाहे मिलत सुहागा।**
**प्रभुजी, तुम स्वामी हम हम दासा, ऐसी भक्ती करे रेदासा।**

भक्तिमार्ग हा ईश्वरांच्या थेट जवळ जातो म्हणून संत रविदासांच्या प्रत्येक वाक्यात ते थेट देवाशी संवाद करतात.

संत रविदास यांनी स्वतः स्पष्टपणे स्वीकारले होते की, ते चर्मकार जातीचे आहेत. त्यांनी आपल्या वाणीतून ते ठामपणे मांडले आहे. त्यांच्या एका रचनेत ते म्हणतात.

**सूरसी जल किया क्रीत बारूनी, रे, जिसे संत जन कर नहीं पान ।**
**सुर अपवित्र नीति गंगा जल मानिऐ, सुरसरी मिलत नही होत आन ॥**
**तर तारी अपवित्र करि मानिऐ, जैसे कागरा करत विचार ॥**
**भगत भगवंत जब ऊपर लेखीए, तब पुजीए करी नमस्कार ॥**
**अनेक अधम जीव नावं गुनी उधारि, पतित पावल भए परसी सार ॥**
**भनत रेदास ररंकार गुण गावत, संत साधू भऐ सहजी पार ॥**

ते स्पष्टपणे सांगतात की सर्व मानव एकाच देह धर्माने बनलेले आहेत. त्वचा, मांस, रक्त यामुळे कोणीही जन्मतः श्रेष्ठ-कनिष्ठ ठरत नाही.

गुरू ग्रंथ साहिबमध्ये संत रविदासांची चाळीस पदे आहेत. ते हिंदू संत असतानाही शिखांच्या धर्मग्रंथात त्यांच्या रचनांना मानाचे स्थान मिळाले, याचाच अर्थ त्यांच्या दोह्यांमधला भावार्थ हा हिंदू धर्मापुरता संकुचित नव्हता. ते मानवतावादी संत होते. त्यामुळेच गुरुनानक हे संत रविदासांची गीत भजने म्हणत असल्याचे संदर्भ आढळतात. संत रविदास संत कबीरांचे गुरुबंधू होते, स्वामी रामानंद त्यांचे गुरू. संत रविदासांच्या विचारांनी प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'द अनटचेबल' हा ग्रंथ संत रविदासांच्या चरणी अर्पण केलेला आहे.

संत रविदास महाराज यांचा जन्म समाजातील वंचित घटकांमध्ये झाला. तरीही त्यांनी कधीही परिस्थितीला दोष न देता मानवतेचा संदेश दिला. "मन चंगा तो कठौती मे गंगा", या त्यांच्या विचारातून अंतःकरणाची शुद्धता हीच खरी भक्ती असल्याचे त्यांनी सांगितले. देवभक्ती ही केवळ कर्मकांडात नसून माणुसकीत आहे, हा संदेश त्यांनी समाजाला दिला. त्यांच्या भक्तांमध्ये समाजातील सर्व लोक होते. त्यात कोणताही भेद नव्हता. त्यामुळे संत रविदास महाराजांनी सामाजिक समरसतेचा पाया मजबूत केला.

सर्व माणसे समान आहेत. त्यांचा जन्म वंचित समाजात झाला होता, पण त्यांचे विचार संपूर्ण मानवजातीसाठी होते. त्यांनी देव मंदिरात नाही, तर माणसाच्या अंतःकरणात आहे हे ठामपणे सांगितले. विषमतेमुळे देशाचे नुकसान होते व ते पाहूनच त्यांनी एकीचा संदेश दिला. ते कर्मकांडात अडकले नाहीत. कुठल्याही अंधश्रद्धेला ते बळी पडले नाहीत. ते म्हणतात- लहान मोठ्यांना अन्न, वस्त्र, निवारा समप्रमाणात मिळाला तर मी प्रसन्न होईल. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि समाजात एकी निर्माण व्हावी हेच विचार त्यांनी आयुष्यभर मांडलेत.

संत रविदास महाराज यांची ६५० वी जयंती साजरी करताना त्यांच्या विचारांचे पालन करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. जात, धर्म, भाषा या पलीकडे जाऊन माणूस म्हणून माणसाशी वागणे हाच संत रविदास महाराजांचा संदेश आहे. एक प्रार्थना आहे, "माणसाने माणसाशी माणसासम वागावे" हाच संदेश ते देतात म्हणून ते आजही आणि सदैव समरसतेचे प्रतीक राहतील. संत रविदास यांचा मृत्यू चितोडगड येथे इसवी सन १५२७ मध्ये झाला. काही लोक त्यांचा मृत्यू बनारस येथे झाला असे म्हणतात. त्यांच्या विचारांना कृतीत आणून आपण एक समताधिष्ठित समरस आणि मानवतावादी समाज घडवूया.

नागपूर

---

## वाचक पत्रे

### समाधानी वृत्ती कमी झाली

समाधान ही वृत्ती असून, आपण ती स्वीकारली तर आयुष्य सुखी होते. परंतु या उलट असमाधानी वृत्ती संकटांना निमंत्रण देतेच पण आपण आपले आरोग्य, मानसिक शांती हरवून बसतो. प्रत्येक जण स्वतः आहे, त्या परिस्थितीत समाधानी नाही. प्रत्येकालाच सारखे काही ना काही हवे आहे. त्यासाठीच हा सर्व आटापिटा आणि शेवटी निराशाच पदरी पडते. गाडी, बंगला, पैसा असूनही लोक असमाधानी आहेत. प्रत्येकाला दुसऱ्यापेक्षा माझ्याकडे जास्त असावे असा हव्यास आहे. दोन भावंडात वारसा हक्काच्या संपत्तीवरून भांडणे आहेत. तुला जास्त, मला कमी यासाठी लाखो खटले न्यायालयात पडून आहेत. नात्यापेक्षा पैसा, संपत्ती महत्त्वाची झाली आहे. एवढ्यावरच हे थांबत नाही, तर दुसऱ्यांचे ओरबाडून

आपल्याकडेच हवे, दुसरा पक्षच असू नये, आमचीच कायम सत्ता असावी. त्यासाठी दुसऱ्यांचे ओरबाडणे, त्यासाठी युक्त्या, क्लृप्त्या करणे. राज्या-राज्यांमधील पाण्यासाठीचे तंटे, सीमावाद ही सर्व असमाधानी वृत्तीची उदाहरणे आहेत. सध्या चालू असलेले अमेरिकन- इराण युद्ध हे देखील असमाधानी वृत्तीचे उत्तम उदाहरण आहे. क्षेत्रफळ मोठ्या असलेल्या अमेरिकेची लोकसंख्या मात्र भारताच्या तुलनेत अगदीच कमी आहे. अमेरिका अतिशय संपन्न देश आहे. सगळ्या जगाचा ओघ अमेरिकेकडे वाहतो आहे. सगळ्या क्षेत्रात प्रगती करूनही अमेरिका असमाधानी आहे. आखाती देशातील तेलावर नियंत्रण मिळवण्यासाठी इराणवर आक्रमण केले आणि स्वतःची पाठ थोपटून घेतली. इराण नमते घेत नाही म्हणून संपूर्ण इराणच नष्ट करू अशी धमकी सतत दिली जाते. म्हणजे अमेरिकेजवळ सर्व असूनही असमाधानी वृत्ती यातून दिसते आणि त्यासाठी

### फूटपाथवरची अतिक्रमणे

मुळात फूटपाथवर अतिक्रमणे महापालिका अधिकाऱ्यांच्या डोळ्यासमोर होतातच कशी, हा एक चिंतेचा विषय आहे. शहरातील रस्ते आज वाढत्या वाहतुकीला कमी पडतात, त्यात



पार्क असल्यामुळे पायी जाणाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्त्यावरून जावे लागते. अशातच स्कूटरवर जाणारे 'बाईक बहाद्दर' केव्हा 'चाटून' जातील सांगता येत नाही. 'पायी चालणाऱ्यांचा रस्त्यावर पहिला हक्क असतो', हे आपल्या देशात कुणी शिकवत नाही. यामुळे रस्त्यावरच्या अपघातात नाहक निर्दोष जीव जातात. सध्या नागपूर महापालिकेने अतिक्रमणाविषयी गंभीरतेने कारवाया सुरू केल्या आहेत, हे स्वागतार्ह आहे. पण अशा कारवाया नियमित सुरू असाव्यात, जेणेकरून 'अतिक्रमणे हटविणे', हे कालांतराने (बेपर्वाईचा काळ गेल्यावर) 'कठीण कार्य' होणार नाही. एखाद्या अतिक्रमणावर लगेच कारवाई झाली तरच बाकी नियम तोडणाऱ्यांना वचक बसेल. दुसरे अतिक्रमणाची वाट पाहत असणारे नियम तोडायची हिंमत करणार नाहीत व महापालिकेचे काम सोपे होईल.

### प्रदूषणावरील अग्रलेख उत्तम

हवेच्या प्रदूषणासंदर्भात 'खुर्च्या उबवणाऱ्यांचे प्रदूषण' हा २३ एप्रिल रोजीचा अग्रलेख वाचला. तो मनापासून आवडला. अग्रलेखातून संबंधित अधिकारी, पुढाऱ्यांचे कान टोचले, हे उचित म्हणता येईल. आज प्रत्येक शहर प्रदूषणामुळे पूर्णपणे काळवंडलेले आहे. रस्त्याने ये-जा करताना वृद्ध मंडळी, रुग्ण यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागते. श्वास घ्यायला अडचण होते. सध्या हवेतला मोकळेपणा कुठे राहिलाच नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळीच पुढचा अनर्थ ओळखून उपाययोजना करायला हव्यात. नागरिकांचा जगण्याचा हक्क हिरावून घेऊ नका. प्रदूषण रोखण्यासाठी राज्य सरकारने दखल घ्यावी.

**डॉ. राहुल भोसले**/पुणे. ९८९०४६१८८६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८

RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# शेक्सपियरच्या साहित्यामध्ये मानवी जीवनाचे तत्वज्ञान : डॉ.रमाकांत निर्मळ



तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | समाजातील चांगल्या वाईट घटनांची प्रतिबिंब साहित्यामधून दिसून येते. जगप्रसिद्ध नाटककार साहित्यिक विल्यम शेक्सपियर यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान प्रतिबिंबित होते असे प्रतिपादन इंग्रजी साहित्याचे अभ्यासक डॉ. रमाकांत निर्मळ यांनी केले. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये २३ एप्रिल जागतिक पुस्तक दिन आणि विल्यम शेक्सपियर यांचा या जन्मदिना निमित्त इंग्रजी विभाग आणि ग्रंथालय विभागाच्यावतीने "इकोज् ऑफ डुम कोअर थीम्स इन शेक्सपियर डार्क ट्रॅजेडीस " या विषयावर आयोजित राष्ट्रीय वेबिनार मध्ये मुख्य मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. पुढे बोलताना डॉ.रमाकांत निर्मळ म्हणाले की, विल्यम शेक्सपियर यांनी लिहिलेले सर्व साहित्य मानवी भावनांना स्पर्श करणारे आहे. त्यांची कविता, नाटके समाजातील घटकांचे प्रतिनिधित्व करतात. शेक्सपियर यांच्या अथेल्लो, हॅम्लेट, म्यागबेथ, आणि किंग क्लियर या शोकांतिका मधील स्त्री - पुरुष पात्र आणि एकंदरीत नाटकातील शोकांतिका यावर त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला. शेक्सपियर यांच्या नाटकातील नायक, खलनायक आणि नायिका त्यांच्या अभिनयातून लक्षवेधी ठरतात असे ते म्हणाले. समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की, शेक्सपियर जागतिक दर्जाचे लेखक आहेत. त्यांच्या साहित्यातील प्रसंग मानवी जीवनातील छटांना स्पर्श करणारे आहेत. त्यांच्या साहित्याचा संपूर्ण जगावर प्रभाव आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संगीता ससाने यांनी केले.परिचय उपप्राचार्य तथा इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी करून दिला.

# भव्य अश्व रिंगण सोहळा २०२६ चे सर्व दिंड्यांना अधिकृत निमंत्रण

## यावर्षीचा सोहळा न भूतो न भविष्यती साजरा होणार, स्वागताध्यक्ष व नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | प्रति वर्षाप्रमाणे अंबाजोगाई मध्ये होणाऱ्या भव्य अश्व रिंगण सोहळा २०२६ चे अधिकृत निमंत्रण संतश्रेष्ठ नामदेव महाराज संस्थान नरसी नामदेव व संतश्रेष्ठ जनाबाई संस्थान गंगाखेड या ठिकाणी स्वागताध्यक्ष व अंबाजोगाईचे नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा उर्फ काकाजी यांच्या वतीने संयोजन समितीचे सचिव तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी विश्वस्तांना दिले.

यापसंगी संतश्रेष्ठ नामदेव महाराज संस्थानचे विश्वस्त माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर, दिंडी चालक श्री भागवतराव पाटील, हरिभक्त परायण मगर महाराज, संयोजन समितीतील शशिकांत नाना गायकवाड, अजय राठोड, संतश्रेष्ठ जनाबाई संस्थानचे दिंडी प्रमुख हरिभक्त परायण शिवाजी महाराज चौधरी यांची उपस्थिती होती. गेल्या १४ वर्षांपासून अंबाजोगाई मध्ये मराठवाड्यातील पहिला भव्य अश्व रिंगण सोहळा संपन्न होतो. अंबाजोगाई तसेच पंचक्रोशीतील हजारो भाविक भक्त या भव्य अश्व रिंगण सोहळ्याचा नयनरम्य आणि भक्ती भावपूर्ण देखावा डोळ्यात साठवून घेतात. यानिमित्ताने शालेय विद्यार्थ्यांवर वारकरी सांप्रदायाचे व संतांचे विचार रुजवले जावेत त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या समूह दिंडी नृत्य स्पर्धेचेही आयोजन केले जाते. या स्पर्धेमध्येही हजारो बालके विविध संतांच्या भूमिकेमध्ये सादरीकरण करतात. यावर्षीचा हा सोहळा भव्य दिव्य स्वरूपात संपन्न व्हावा यासाठी संयोजन समितीचे स्वागताध्यक्ष व आंबा नगरीचे नूतन लोकनियुक्त नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा उर्फ काकाजी, हरिभक्त परायण बाबा महाराज जवळगावकर, श्री दिलीप दादा सांगळे, माजी नगराध्यक्ष महादू मस्के, श्री मारुतीराव रेड्डी, श्री दिलीप गीते, श्री बळीराम चोपणे, अनंत आरसुडे, प्रसिद्धी प्रमुख अभिजीत गाठाळ, अविनाश मुडेगावकर, प्रशांत आदनाक, संतोष आबा लोमटे, वैजनाथ देशमुख इत्यादी परिश्रम घेत आहेत अशी माहिती संयोजन समितीचे सचिव तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी दिली आहे.

# पोखरीघाट ग्रामस्थांचा आदर्श पायंडा!

## हरिनाम सप्ताहात कुस्ती खेळाला प्रोत्साहन : राजेंद्र मस्के

तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी** | कुस्ती हा भारतातील पारंपरिक, मैदानी ताकदीचा व मानाचा खेळ म्हणून प्रसिद्ध आहे. मैदानी कुस्ती हा केवळ खेळ नसून ताकद, धैर्य, शिस्त आणि रांगड्या संस्कृतीचे प्रतीक मानला जातो. युवकांनी हा खेळ आत्मसात करून शरीरा सोबत मन ही सक्षम व सुद्दढ करावे. अनेक नामांकित पैलवानांनी याच खेळातून देशाचे नाव उज्वल केले.

पोखरीघाट ग्रामस्थांनी अध्यात्म आणि शिक्षणाला नेहमीच प्राधान्य दिले. अखंड हरिनाम महोत्सवा निमित्त जंगी कुस्ती मैदानाचे आयोजन करून मेहनती पैलवानांना प्रोत्साहन देणारा आदर्श पायंडा निर्माण केला.

हा स्तुत्य आणि प्रेरणादायी उपक्रम ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रुजवला पाहिजे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी पोखरी घाट येथील कुस्ती स्पर्धा प्रसंगी केले.

पोखरी घाट ता बीड येथे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज मंदिर १६ वा.वर्धापन दिना निमित्त श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थांचे महंत महादेव महाराज भारती व हभप तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली भावार्थ रामायण व त्रिदिनी किर्तन महोत्सवाचे आयोजन केले होते.

हभप मारूती महाराज चोरमुले यांच्या कीर्तनाने सांगता झाली. या निमित्ताने सुमारे ४२ जंगी निकाली कुस्तींचे मैदान संपन्न झाले. ग्रामस्थांच्या वर्गणीतून सात लाख ६५ हजारांचे रोख बक्षीस वाटप करण्यात आले. अकराशे रु.पासून बक्षीसांची सुरवात होती..बक्षीस पटकावले. या थरारक निकाली कुस्तीने मैदानात जल्लोष पसरला. रखरखत्या उन्हातही कुस्ती स्पर्धेत उत्साह संचारला होता. कुस्त्यांचा सामना बघण्यासाठी लिंबागणेश- पोखरी परिसरातील अबालवृद्ध जनतेनी तोबा गर्दी केली होती.

# सहयोगनगर येथील गजानन महाराज मंदिरात शिवलिंग चलप्राणप्रतिष्ठा उत्साहात संपन्न





तभा. वृत्तसेवा

**बीड प्रतिनिधी** | वैशाख शुक्ल सप्तमी व गंगा उत्पत्ती दिनाच्या पावन मुहूर्तावर गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी शहरातील सहयोगनगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात 'श्रीमहादेव-श्रीनंदी' यांसह 'हरीहर शिवलिंग'चा भव्य चलप्राणप्रतिष्ठा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या विशेष शिवलिंगामध्ये ब्रह्मा, विष्णू व महेश यांचे एकत्रित दर्शन घडत असल्याने भाविकांमध्ये विशेष आकर्षण व उत्सुकता पाहायला मिळाली. पहाटे ५.३० वाजल्यापासून धार्मिक विधींना प्रारंभ झाला. श्रीगणेश, श्रीविठ्ठल-रुख्मिणी, श्रीगजानन महाराज, श्रीगुरुदेव दत्त व श्रीराम पंचायतन दैवतांच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यानंतर सकाळी ८.३० ते ११.३० या वेळेत 'हरीहर शिवलिंग'वर वेदमंत्रांच्या गजरात रुद्राभिषेक करण्यात आला. मंदिर परिसर 'हर हर महादेव'च्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. दुपारी १२ वाजता महाआरती करण्यात आली आणि त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या सोहळ्यास सहयोगनगर व परिसरातील मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावून दर्शनाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन श्री गजानन सांस्कृतिक मंडळ, सहयोग नगर, बीड यांच्या वतीने उत्कृष्टरीत्या करण्यात आले.

# विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमाला ; पुष्प- 4 थे

## निरोगी जीवनशैलीसाठी सकस आहार, व्यायाम, मानसिकता, स्वच्छता आणि नियमितता या पंचसूत्रीचा अवलंब करणे हीच दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे ; डॉ. राम जावळे



तभा. वृत्तसेवा

**केज प्रतिनिधी** | आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक लोकांना आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनियमित दिनचर्या, ताणतणाव, अपूर्ण झोप आणि असंतुलित आहार यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. तेंव्हा आपले आरोय आपल्या हाती ठेवपयासाठी दररोज नियमित व्यायाम, संतुलित व पोषक आहार, ७ ते ८ तासांची शांत झोप, आणि भरपूर पाणी पिणे आवशयक आहे. तसेच ताणतणाव व्यवस्थापन, वैयक्तिक स्वच्छता, सकारात्मक विचार, आणि वर्षातून एकदा नियमित शरीर तपासणी करून तुम्ही निरोगी जीवनशैली जगू शकता. तेंव्हा निरोगी जीवनशैलीसाठी सकस आहार, शारीरिक हालचाल, सकारात्मक मन, स्वच्छता आणि नियमित दिनचर्या या पंचसूत्रीचा अवलंब करणे हीच दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे. असे प्रतिपादन लातूर येथील डॉ. राम जावळे यांनी केले.

केज येथील स्वामी विवेकानंद विद्या मंदिर या शाळेमध्ये दि. २३ एप्रिल रोजी जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित स्व. विश्वंभर कोकिळ जीवन विकास व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. राम जावळे रोग प्रतिबंधन तथा जनरल सर्जन, जिजामाता आरोग्यालय, हॉस्पिटल, लातूर. तर अध्यक्ष म्हणून डॉ. दिनकर राऊत बालरोग तज्ञ, योगिता हॉस्पिटल केज. हे उपस्थित होते.

# जागतिक पुस्तक दिनी विद्यार्थ्यांनी केले सामूहिक वाचन

## रोटरी क्लब व स्वामी विवेकानंद विद्यालयाचा उपक्रम



तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिरातील सर्व शालेय विद्यार्थ्यांनी एकत्रित येत जागतिक पुस्तक दिन सामूहिक वाचन करून साजरा केला.३७८ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर येथे असणाऱ्या इंट्रॅक्ट क्लब मधील विद्यार्थ्यांसोबत सामूहिक वाचन उपक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शांत वातावरणात बसून विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचनाचा आनंद घेतला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, ज्ञानाची गोडी वाढवणे आणि विचारशक्ती विकसित करणे हा होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक , शाळेच्या मुख्याध्यापिका स्वरूपा कुलकर्णी ,प्रा. अजय पाठक यांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात रोहिणी पाठक यांनी त्यांनी सांगितले की,

"पुस्तक हे माणसाचे खरे मित्र असतात. वाचनामुळे ज्ञान वाढतेच, पण व्यक्तिमत्त्वही घडते. विविध गुणांचा विकास घडतो ,मोबाईलच्या युगात मुलांनी पुस्तकांकडे वळणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात स्वरूपा कुलकर्णी यांनी वाचन संस्कृती रुजविण्याचे आवाहन केले.

# निष्ठावंत अनिलदादा जगताप यांना विधान परिषदेत संधी द्या : सुनिल सुरवसे



तभा. वृत्तसेवा

**बीड, प्रतिनिधी** | महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते सन्मानीय ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीत शिवसेनेच्या कोट्यातील किमान एक जागा बीड जिल्ह्यासाठी राखीव ठेऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांना विधान परिषद या जागेसाठी संधी द्यावी, अशी ठाम मागणी शिवसेना जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांनी केली आहे. तसेच या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून जिल्ह्यातील शिवसैनिकांना न्याय द्यावा आणि संघटन अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने मदत करावी. असे आवाहनही त्यांनी केले आहे. अनिलदादा जगताप यांनी १९८६ पासून शिवसेनेत कार्य करत तब्बल चार दशकांहून अधिक काळ पक्षाशी निष्ठा ठेवली आहे. शिवसैनिक, शाखाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख ते जिल्हाप्रमुख असा त्यांचा प्रवास असून नगरसेवक, जिल्हा परिषद आणि विधानसभा अशा विविध निवडणुकाही त्यांनी पक्षाच्या चिन्हावर लढवल्या आहेत. वयाच्या सोळाव्या वर्षापासून शिवसेना हाच त्यांचा परिवार राहिला असून त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि निष्ठावान कार्याचा विचार करता त्यांना विधान परिषदेत संधी देणे योग्य ठरेल, असे मत व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, एकेकाळी बीड जिल्ह्यातील सातपैकी चार मतदारसंघांवर शिवसेनेचे वर्चस्व होते. माजलगाव, बीड आणि गेवराईसारख्या मतदारसंघांतून शिवसेनेचे आमदार निवडून येत होते. मात्र बदलत्या राजकीय समीकरणांमुळे हळूहळू हे सर्व मतदारसंघ पक्षाच्या हातातून निसटले.

# नवीन पंचतारांकित एमआयडीसी संदर्भात आ. संदीप क्षीरसागरांनी घेतली उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट

## पुढच्या आठवड्यात होणार मंत्रालय स्तरावर बैठक

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | बीड येथे नवीन पंचतारांकित एमआयडीसी निर्माण करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांचा नियमित पाठपुरावा सुरू आहे. त्या अनुषंगाने बुधवारी (दि.२२) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्यावर उद्योगमंत्री यांनी पुढील आठवड्यात या विषयावर मंत्रालय स्तरावर बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधितांना दिले आहेत.

बीड हा औद्योगिक आणि शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने मागासलेला जिल्हा आहे. बीड जिल्ह्यात विकास करण्यासाठी बीडमध्ये पंचतारांकित एमआयडीसी होणे ही अत्यावश्यक बाब आहे. जेणेकरून याठिकाणी रोजगार निर्मिती होऊन तरूणांना रोजगार उपलब्ध होईल आणि आर्थिक चालना मिळेल. याबाबत आ.संदीप क्षीरसागर हे मागील अनेक दिवसांपासून शासन आणि प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. दरम्यान बीड शहरालगत असलेल्या घोडका राजुरी आणि काठोडा येथे नवीन एमआयडीसी होणेबाबत प्रशासकीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे. या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागर यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन याविषयावर सविस्तर चर्चा करून विषयाचे निवेदन मंत्री महोदयांना दिले. त्यावर उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुढच्या आठवड्यात या संदर्भात बैठक आयोजित करण्याचे निर्देश संबंधितांना दिले असून बीडमध्ये नवीन पंचतारांकित एमआयडीसी होण्याच्या वाटचालीकडे हे मोठे पाऊल असणार आहे.

# भावठाणा येथे अखंड हरिनाम सप्ताहात भक्तीचा दरवळ; चौथ्या दिवशी रमणदेव महाराज कुलकर्णी यांचे प्रभावी कीर्तन







**अंबाजोगाई** | मौजे भावठाणा, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील श्री मारुती व भावनाथ मंदिर संस्थानच्या वतीने आयोजित भावनाथेश्वर अखंड हरिनाम सप्ताह, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व श्रीमद् भागवत कथा सोहळा मोठ्या भक्तीभावात सुरू आहे.

सप्ताहाच्या चौथ्या दिवशी ह.भ.प. श्री रमणदेव महाराज कुलकर्णी (नागपिपरी) यांनी किर्तनरूपी सेवा सादर करत संत तुकाराम महाराज यांच्या अभंग क्रमांक ४९८ "होय होय वारकरी, पाहे पाहेने पंढरी..." यावर अत्यंत भावपूर्ण व विचारप्रवर्तक निरूपण केले.

या अभंगाच्या माध्यमातून वारकरी भक्तीमार्गाची साधी परंतु गहन शिकवण उलगडत, खऱ्या वारकऱ्याला सर्वत्र पंढरीचे दर्शन कसे घडते, भक्तीमुळे अहंकार कसा नाहीसा होतो आणि मनाला समाधान कसे प्राप्त होते, याचे सुंदर विवेचन करण्यात आले. "तुका म्हणे डोळां, विठो बैसला सांवळा" या ओळीचा अर्थ स्पष्ट करत अखंड देवस्मरणाचे महत्त्वही त्यांनी पटवून दिले.

या कीर्तनामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून हरी जागर केंद्रेवाडी (वडगाव कोद्री) यांच्या उपस्थितीने सोहळ्याला अधिक रंगत आली.

दरम्यान, सकाळच्या सत्रात श्री बळीराम (भाऊ) अमृता यादव यांच्या वतीने अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत भाविकांसाठी भोजन व्यवस्था करण्यात आली. तसेच सायंकाळच्या सत्रात श्री विष्णुपंत (तात्या) मारोती मगर यांच्या वतीने सायंकाळी ६ ते ८ या वेळेत अन्नदान करण्यात आले

या धार्मिक सोहळ्यामुळे भावठाणा परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## चालत्या ट्रकमधून हरभऱ्याचे ११ कट्टे चोरी

**तभा वृत्तसेवा**
**ढोकी, दि.२४ एप्रिल -**

चालत्या मालवाहू वाहनातून हरभऱ्याची चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत शिवराज धनराज थळकरी (वय ३०, रा. युसुफ वडगाव, ता. केज, जि. बीड) यांनी ढोकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

थळकरी हे आयशर गाडी (क्र. एमएच १४ ईएम ०५२३) मधून नाफेड खरेदी केंद्र, शिंगोली (ता. कळंब) येथून हरभऱ्याचे ३६० कट्टे लातूर येथील वखार महामंडळाच्या गोदामात साठवण्यासाठी नेत होते.



दरम्यान, दि. १९ एप्रिल रोजी दुपारी १२ ते २० एप्रिल पहाटे १ वाजेच्या सुमारास ढोकी-पळसप पाटी परिसरात अज्ञात चोरट्यांनी चालत्या वाहनावर चढून ताडपत्री फाडली व ११ कट्टे (किंमत सुमारे ३२ हजार ३१२ रूपये) चोरून नेले.

या प्रकरणी ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



# धाराशिवच्या औद्योगिक क्रांतीचा श्रीगणेशा

**▶▶ १५,४३० कोटींचा संरक्षण प्रकल्प उभारणार... ▶▶ ग्लोब फोर्ज लि. कंपनी करणार गुंतवणूक...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची घडामोड घडत असून कौडगाव परिसरात ग्लोब फोर्ज लिमिटेट (पूर्वीची निबे लिमिटेड) कंपनीकडून तब्बल १५,४३० कोटींची गुंतवणूक करून संरक्षण क्षेत्रातील भव्य उत्पादन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे धाराशिव आणि अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यांच्या विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

या संदर्भात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी माहिती देताना सांगितले की, या प्रकल्पामुळे जिल्ह्यातील औद्योगिक वातावरणात मोठा बदल होणार असून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. धाराशिव जिल्हा केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता आता 'संरक्षण उत्पादन केंद्र' म्हणून ओळख निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्य सरकारच्या पाठबळामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा मोठा प्रकल्प जिल्ह्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्राताई पवार आणि उद्योग मंत्री उदय सामंत यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगत त्यांनी सर्वांचे आभार मानले.



दरम्यान, या प्रकल्पामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. उद्योग, पायाभूत सुविधा आणि सेवा क्षेत्रातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. धाराशिव जिल्ह्याच्या औद्योगिक इतिहासात हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सतत केलेल्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूकीचा मार्ग मोकळा झाला आहे.

## शेतातील राजमा पीक जाळून २ लाखांचे नुकसान

**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

शेतातील उभ्या पिकाला आग लावून मोठे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी संदीप शिवाजी गायकवाड (रा. गुंफावाडी, ता. जि. लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

दि.२२ एप्रिल पहाटेच्या सुमारास जागजी शिवारात फिर्यादी सचिन गायकवाड (वय ४२, रा. गुंफावाडी) यांच्या राजमा पिकाला आरोपीने आग लावली. यामध्ये स्प्रिंकलरचे १० पाइप, २ ताडपत्री व इतर साहित्य जळून सुमारे २ लाख रुपयांचे नुकसान झाले.

## तामलवाडीत पोलिसांची धाडसी कारवाई; ४६ ग्रॅम एमडीसह दोघे जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे पोलिसांनी धाडसी कारवाई करत दोन आरोपींना ४६ ग्रॅम एमडी (ड्रग्ज) सह ताब्यात घेतले. ही कारवाई तामलवाडी पोलिसांनी सोलापूर पोलिसांकडून मिळालेल्या गुप्त माहितीनुसार केली.

पुणे येथून कारद्वारे ड्रग्ज तस्करी होत असल्याची माहिती सोलापूर पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी तामलवाडी पोलिसांना सतर्क केले. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या पथकाने परिसरात नाकाबंदी केली. पोलिसांना पाहताच संशयितांनी कारला यू-टर्न घेत तामलवाडी गावाच्या दिशेने पळ काढला.



या दरम्यान मुख्य आरोपी तोसिफ फरीद सय्यद (रा. कसबा पेठ, पुणे) हा कारमधून उतरून ज्वारीच्या शेतात पळून गेला, तर दुसरा आरोपी सुफयान शब्बीर फुलारी (रा. पुणे) याने कार पिंपळा गावाच्या दिशेने नेली. मात्र, रस्त्यात कार बंद पडल्याने त्याने वाहन सोडून शेतात लपण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी तत्काळ शोधमोहीम राबवत दोघांचाही पाठलाग केला. कर्मचारी उमेश माने व गोपाळ सलगर यांनी सुमारे दोन किलोमीटर पाठलाग करून तोसिफ सय्यद याला पकडले. तो तामलवाडीतील पाणपोईजवळ पाणी पिताना नागरिकांच्या सतर्कतेमुळे ओळखला गेला. तर सुफयान फुलारी हा शेतातील विहिरीत लपून बसलेला आढळून आला, त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

आरोपींकडून ४६ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले असून दोघांनाही पुढील तपासासाठी सोलापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

यापूर्वीही तामलवाडी परिसरात ड्रग्ज प्रकरण उघडकीस आले होते. त्यामुळे तुळजापूर तालुक्यात ड्रग्ज तस्करीचे जाळे सक्रिय असल्याची शक्यता व्यक्त होत असून, पोलिसांकडून तपास अधिक तीव्र करण्यात येत आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### मोफत पाणपोयीचा शुभारंभ

**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

अक्षय तृतीया निमित्ताने तुळजापूर येथे एकनाथ फाउंडेशन यांच्या वतीने श्री तुळजाभवानी मंदिर येथे येणाऱ्या भाविकांसाठी मोफत पाणपोयी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर भाविकांना दिलासा देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. उद्घाटनप्रसंगी रवींद्र इंगळे, विकास जाधव, दीपक थोरात, प्रफुल्ल कुमार शेटे, लक्ष्मण माळी यांच्यासह ज्ञानेश्वर गवळी, अहमद अन्सारी, सचिन टेले, सुरज बागल, सतीश फत्तेपुरे, श्रीकांत कदम आदी उपस्थित होते.



### डॉक्टरांकडून ३०० पुस्तकांचे वाटप

**धाराशिव, दि.२४ एप्रिल -**

जागतिक पुस्तक दिन निमित्त वाचन संस्कृतीला चालना देत सामाजिक बांधिलकी जपण्याचा उपक्रम म्हणून बालरोगतज्ज्ञ संघटनेच्या वतीने ३०० पुस्तके भेट देण्यात आली. जिल्हा वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवाहनाला प्रतिसाद देत अखिल भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटनेने ही पुस्तके अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण यांच्याकडे सुपूर्त केली. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय खुणे, सचिव डॉ. नितीन भोसले यांच्यासह डॉ. अभय शहापूरकर, डॉ. संजय सोनटक्के, डॉ. श्रीनिवास हंबिरे, डॉ. अभिजीत बागल आणि डॉ. अक्षय देशमुख उपस्थित होते. मान्यवरांनी या उपक्रमामागील सामाजिक जाणीव व शैक्षणिक बांधिलकी अधोरेखित केली. बालरोग विभागातील डॉ. मनोज घोगरे, डॉ. शाम चौधरी आणि डॉ. निलोफर भोरी यांनी पुस्तके स्वीकारत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्याचा निश्चितच उपयोग होईल, असे मत व्यक्त केले.

### ८० रुग्णांची तपासणी

**भूम, दि.२४ एप्रिल -**

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन व नीती आयोगामार्फत फिरता दवाखाना मार्फत दि.२४ रोजी भूम तालुक्यातील ईट येथील बसस्थानक येथे सकाळी १० वाजता रुग्णाची मोफत तपासणी करण्यात आली. हा दवाखाना दोन दिवस सुरु असून यास राष्ट्रवादीचे सुनील देशमुख, बाबा भोसले यांनी या फिरत्या दवाखान्यात भेट दिली. यावेळी डॉ. मकबूल हनुरे, आरोग्य सेवक विकास खराडे, मोहन लोहार, राहुल जाधव, सिद्धेश्वर चौरे,आदी उपस्थित होते. या दवाखान्यात लॅब द्वारे तपासणी करण्यात आली शुगर एक्स-रे बीपी तपासून मेडिकल औषधे वाटप करण्यात आली. यावेळी आशा कार्यकर्ते वैशाली हाडुळे, छाया गायकवाड, मनीषा राऊत, निर्णला तमंचे, सत्यभामा कळसकर, आदिंनी परिश्रम घेतले.

### गोवंशीय वासरांची अमानुष वाहतूक

**परंडा, दि.२४ एप्रिल -**

गोवंशीय वासरांची निर्दयीपणे कोंबून वाहतूक करताना एकाला पोलिसांनी पकडल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफीक निसार मुलानी (वय ३५, रा. अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. दि.२३ एप्रिल रोजी सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास करमाळा-धाराशिव रोडवर रोसा गावाजवळ पिकअप (क्र.एमएच १२ डीटी ११२२) मधून ४० गोवंशीय वासरे कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती परंडा पोलिसांना मिळाली. तपासणीदरम्यान वासरांचे तोंड व पाय बांधून कमी जागेत कोंबून अमानुषरीत्या वाहतूक केली जात असल्याचे आढळले. पोलिसांनी सुमारे २ लाख रुपये किमतीची वासरे व ९ लाख रुपये किमतीचे वाहन असा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.



## भूम तहसील कार्यालयात राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेत अनियमिततेचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२४ एप्रिल -**

भूम तहसील कार्यालयात राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेच्या अंमलबजावणीत अनियमितता झाल्याचा आरोप भारतीय काँग्रेसच्या वतीने करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून योजनेची तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी तहसीलदार जयवंत पाटील यांना निवेदन देऊन करण्यात आली.



निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, मार्च अखेरीस मंजूर झालेल्या ६ प्रस्तावांपैकी केवळ २ प्रस्ताव ऑनलाइन प्रणालीत दिसत असून उर्वरित ४ प्रस्ताव तांत्रिक अडचणीमुळे गायब झाले आहेत. परिणामी, मंजुरी मिळूनही संबंधित लाभार्थी कुटुंबांना आर्थिक मदतीपासून वंचित राहावे लागत आहे.

आर्थिक वर्ष संपल्याने निधीअभावी परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे. या कुटुंबांनी कमावता सदस्य गमावल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने तांत्रिक त्रुटी दूर करून प्रलंबित लाभार्थ्यांना निधी वितरित करावा, अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. दरम्यान, या मागणीसाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भूम, परंडा, वाशी युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष मोईज सय्यद शेखापुरकर यांनी दिला आहे.

यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष विलास शाळू, एन.एस.यू.आय.चे जिल्हाध्यक्ष ॲड. मुशरफ सय्यद, सोपान वरवडे, ॲड. सोहेल शेख, उमेश ढगे, रमेश पवार, अमोल वाघमारे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## तीन महिन्यांचे धान्य एकाचवेळी...!

## केंद्राच्या निर्णयाने लाभार्थ्यांना दिलासा; पण अंमलबजावणीत अडथळे

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२४ एप्रिल -**

लाखो गरजू कुटुंबांच्या अन्नसुरक्षेशी थेट संबंधित असलेल्या धान्य वितरणाबाबत केंद्र शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एप्रिल, मे आणि जून २०२६ या तीन महिन्यांचे धान्य आगाऊ उचलून एकत्रित वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना तात्पुरता दिलासा मिळणार असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी समोर येत असल्याचे चित्र आहे.

रास्तभाव दुकानांमध्ये धान्याचा पुरेसा साठा नसल्यामुळे अनेक ठिकाणी लाभार्थ्यांना वेळेवर धान्य मिळण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने प्रथम एप्रिल महिन्याचे धान्य वाटप करण्यावर भर द्यावा, त्यानंतरच मे व जून महिन्याचे धान्य वितरित करावे, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

केंद्र सरकारच्या निर्देशानुसार, कार्डधारकांना एप्रिल ते जून या तीन महिन्यांचे गहू व तांदूळ एकाचवेळी देण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे लाभार्थ्यांना वारंवार रेशन दुकानावर जाण्याची गरज भासणार नाही. मात्र, सध्या पॉस मशीनवर तीन महिन्यांचा डेटा उपलब्ध नसल्याने लाभार्थ्यांना सध्या एप्रिल महिन्याचेच धान्य घ्यावे लागत आहे.




केंद्र सरकारकडून प्रति व्यक्ती दरमहा ५ किलो गहू व तांदूळ मोफत दिले जातात. पॉस मशीनद्वारे अंगठा पडताळणी करून धान्य वाटप केले जाते.

आगामी गहू खरेदी हंगाम लक्षात घेऊन केंद्राने राज्यांना तीन महिन्यांचे धान्य आगाऊ उचलण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून गोदामांमध्ये नवीन धान्य साठवण्यासाठी जागा उपलब्ध होईल.

या विशेष निर्णयामुळे ग्रामीण व शहरी गरीब कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे. रेशन कार्डधारकांमध्ये या निर्णयाबाबत समाधान व्यक्त केले जात असले, तरी वितरण व्यवस्थेतील तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## महिला विधेयकावरून ठराव; काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत महिला विधेयकाला विरोध केल्याच्या मुद्द्यावरून काँग्रेस व त्यांच्या सहयोगी पक्षांच्या भूमिकेचा निषेध व्यक्त करणारा ठराव मंजूर करण्यात आला.

दि.२१ एप्रिल रोजी पार पडलेल्या नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत हा ठराव मांडण्यात आला. सभेच्या शेवटी भाजपाचे गटनेते दत्तात्रय दासकर यांनी लोकसभेत मांडण्यात आलेल्या महिला विधेयकास काँग्रेसने विरोध केल्याचा मुद्दा उपस्थित करत निषेधाचा ठराव सभागृहात मांडला. यावेळी त्यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण, प्रगती आणि स्वावलंबनासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने लोकसभेत महिला विधेयक मांडण्यात आले होते.

मात्र, काँग्रेस व त्यांच्या मित्र पक्षांच्या विरोधामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे काँग्रेसच्या महिलांविरोधी भूमिकेचा निषेध करण्याचा ठराव सभागृहात सादर करण्यात आला. दरम्यान, हा ठराव भाजप व शिवसेनेच्या सदस्यांच्या पाठिंब्याने मंजूर करण्यात आला.

सभेस नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपाध्यक्ष नय्यर जहागिरदार, सभापती तानाजी जाधव, शशिकांत पुदाले, सुमन ठाकूर, तसेच रीजवान काझी, निरंजन राठोड, प्रविण गायकवाड, नगरसेविका राणी सुरवसे, छमा राठोड, मिनाक्षीताई काळे, साक्षी नळदुर्गकर आदी उपस्थित होते.

## नळदुर्ग बसस्थानकातील 'हिरकणी कक्ष' वापराविना

### महामंडळाची योजना फसल्याची चर्चा...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२४ एप्रिल -**

नळदुर्ग बसस्थानकात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने उभारलेला 'हिरकणी कक्ष' गेल्या पाच वर्षांपासून अक्षरशः धुळखात पडलेला असून त्याचा वापरच झालेला नसल्याचे समोर आले आहे. ज्या उद्देशाने हा कक्ष उभारण्यात आला, तोच उद्देश साध्य न झाल्याने ही योजना अपयशी ठरल्याची चर्चा रंगू लागली आहे.

महामंडळाने राज्यातील बसस्थानकांमध्ये मातांना आपल्या बालकांना स्तनपान करता यावे, यासाठी 'हिरकणी कक्ष' उभारण्याचा उपक्रम राबवला होता. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या कक्षांचा वापरच होत नसल्याने उभारणीवर झालेला खर्च वाया गेल्याचे चित्र आहे. नळदुर्ग बसस्थानकातही अशीच परिस्थिती दिसून येत आहे.




नळदुर्ग बसस्थानक हे राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचे ठिकाण असून परिसरातील ५० ते ६० गावांसाठी हे मध्यवर्ती स्थानक आहे. राज्य तसेच परराज्यात जाणाऱ्या बसगाड्यांमुळे येथे नेहमीच प्रवाशांची मोठी वर्दळ असते. असे असतानाही येथे उभारलेल्या 'हिरकणी कक्षाचा' गेल्या पाच वर्षांत वापर झाला नसल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या योजनेत आवश्यकतेचा पुरेसा विचार न करता कक्ष उभारण्यात आल्याचा आरोप होत असून, केवळ ठेकेदारांना लाभ मिळवून देण्यासाठीच ही कामे करण्यात आली अशीही टीका होत आहे. त्यामुळे या योजनेवरील खर्च पाण्यात गेल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

नळदुर्गप्रमाणेच राज्यातील इतर अनेक बसस्थानकांमध्येही 'हिरकणी कक्ष' वापराविना पडून असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या योजनेचे पुनरावलोकन करून कक्षांचा योग्य उपयोग होण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

# तुळजापूरातील रस्ते घेतायत मोकळा श्वास : अतिक्रमणाविरोधी शहरात मोठी कारवाई

**▶▶ अतिक्रमण मोहिमेमध्ये व्यापाऱ्यांचे नुकसान...! ▶▶ व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण... ▶▶ चार दिवस मोहिम सुरू राहणार...**







**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२४ एप्रिल -**

शहरात वाढत्या अतिक्रमणांना आळा घालण्यासाठी नगरपरिषदेने दि.२३ एप्रिल रोजी मोठी अतिक्रमणविरोधी मोहीम राबवली. भवानी रोड, महाद्वार रोड, तुळजाभवानी मंदिर परिसर तसेच खडकाळ गल्ली येथे व्यापाऱ्यांनी रस्त्यावर केलेली अनधिकृत अतिक्रमणे व बांधकामे हटविण्यात आली.

या मोहिमेसाठी नगरपरिषद प्रशासनाने जेसीबी, ट्रॅक्टरसह मोठा फौजफाटा तैनात केला होता. नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलीस प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण तसेच मंदिर प्रशासनाचे कर्मचारी यांच्या संयुक्त सहभागातून सकाळपासून कारवाईला सुरुवात करण्यात आली.

पूर्वीच सात दिवसांची नोटीस देऊनही अनेक व्यापाऱ्यांनी अतिक्रमणे कायम ठेवली होती. त्यामुळे अचानक सुरू झालेल्या या मोहिमेमुळे व्यापाऱ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला.

कारवाईदरम्यान काही व्यापाऱ्यांनी नगरपरिषद प्रशासनावर पक्षपातीपणाचा आरोप करत तोंड पाहून अतिक्रमण काढण्यात आले अशी प्रतिक्रिया दिली. नगराध्यक्ष स्वतः उपस्थित राहिल्यानेही काही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. या मोहिमेत दुकानांसमोरील ओटे, पानसळ्या, बोर्ड व मांडणी यावर जेसीबी फिरवल्याने अनेक व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, अतिक्रमणे हटवल्यानंतर शहरातील रस्ते मोकळे झाल्याने वाहतुकीला दिलासा मिळाला असून रस्ते अधिक रुंद दिसू लागले आहेत.

ही मोहीम पुढील चार दिवस सुरू राहणार असल्याची माहिती मिळत असून व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# रखरखत्या उन्हात पत्र्याच्या शेडमध्ये होणार चिमुकल्यांची परीक्षा ; पालकात तिव्र नाराजी

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २४ एप्रिल -**



तालुक्यातील सावरगाव (नसरत) येथे २६ एप्रिल रोजी चौथीच्या विद्यार्थीची स्कॉलरशिप परीक्षा आहे , विद्यार्थ्यांना पेपर सोडवण्यासाठी पत्रा शेडमध्ये व्यवस्था केल्याने पालकात तिव्र नाराजी पसरली आहे. रखरखत्या उन्हाच्या गरमीत लहान बालके पेपर सोडवतील कि घामा साफ करतील यामुळे परिक्षा केद्र वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे.

सावरगाव येथील शिवनिकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. शाळेतील सर्व वर्गखोल्या पत्र्याच्या शेडमध्ये आहेत. रखरख उन्हाचे दिवस आसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या मराठवाड्यात उष्णतेची लाट तीव्र असून नांदेड जिल्ह्यात तापमान ४७ अंश सेल्सिअसच्या पुढे जाण्याची दाट शक्यता आहे. अशा परिस्थितीत लहान विद्यार्थ्यांना पत्र्याच्या खोल्यांमध्ये परीक्षा देण्यास भाग पाडणे म्हणजे त्यांच्या जिवाशी खेळ असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे. उष्माघाताचा धोका लक्षात घेता, एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित शिक्षण विभागावर राहील, असा इशाराही पालकांनी दिला आहे. विशेष म्हणजे, संबंधित विद्यालयातील खोल्या पत्र्याच्या असल्याची माहिती शिक्षण विभागाला असतानाही येथेच परीक्षा केंद्र देण्यात आल्याने शंका व्यक्त केली जात आहे. यामागे नेमके कारण कायप्रशासकीय हलगर्जीपणा, आर्थिक व्यवहार की राजकीय दबावयाबाबत पालकांत चर्चा सुरू आहे.मागील काळात शिक्षण विभाग चिरीमिरीने बदनाम झाले आशाच प्रकार आसु शकतो कारण शिक्षण विभागत मोठ्या प्रमाणात चिरीमिरीने सिरकाव केला आहे.केंद्रांतर्गत येणाऱ्या रिसनगाव येथे केंद्रप्रमुख पद रिक्त असून शिक्षण विस्तार अधिकारीही उपलब्ध नाहीत. तक्रार नोंदवण्यासाठी पालकांनी गटशिक्षणाधिकारी व जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र अनेक वेळा फोन करूनही प्रतिसाद न मिळाल्याने .पालकात नाराजीचा जोर वाढला आहे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी तडजोड मान्य नाही. अशा परिस्थितीत आम्ही मुलांना परीक्षेला बसवणार नाही, असा ठाम पवित्रा पालकांनी घेतला आहे. पर्यायी, सुरक्षित व सुसज्ज केंद्रावर परीक्षा घेण्याची पालक मागणी प्रशासनाकडे केली आहे.



# किनवटमध्ये कर्मचाऱ्यास मारहाण ७५ कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ एप्रिल -**

किनवट नगरपरिषदे मधील पाणीपुरवठा विभागात कार्यरत असलेले सफाई कामगार नरसिंग गंगाराम यांच्यावर दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी शासकीय काम करत असताना नगरसेवक अभय नगराळे यांनी शिवीगाळ करत मारहाण केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित कर्मचारी दिव्यांग असल्याने ही घटना अधिक गंभीर असल्याचेही निवेदनात अधोरेखित करण्यात आले आहे.

या घटनेच्या निषेधार्थ किनवट नगरपरिषदेमधील सुमारे ७० ते ७५ कर्मचाऱ्यांनी दिनांक २४ एप्रिल २०२६ पासून कामबंद आंदोलन सुरू केल्याचे निवेदनात म्हटले आहे. या आंदोलनामुळे शहरातील स्वच्छता व पाणीपुरवठा सेवांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनात पुढे नमूद केल्याप्रमाणे, संबंधित नगरसेवकावर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, तसेच त्यांना अपात्र घोषित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासोबतच पीडित कर्मचाऱ्याला न्याय व संरक्षण देण्याचीही मागणी कर्मचारी संघटनेने केली आहे.

कर्मचाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला असून, जोपर्यंत प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद आहे.या निवेदनावर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष किरण कलगोटुवार, उपाध्यक्ष अल्ताफ अ.गफुर,सचिव सुरेश पुरुडवार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांना विधान परिषदेत संधी देण्याची मागणी



**हाणेगाव** -महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खंदे समर्थक शिवसेना गटाचे नेते ओबीसी विजेएनटी चे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किशवे यांना शिवसेना पक्षाकडून आगामी विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात यावी अशी जोरदार मागणी त्यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. ही मागणी अहिल्यानगर येथील ओबीसी नेते शिवाजी त्र्यंबक गजभार यांनी केली आहे गजभार यांनी सांगितले की बाळासाहेब किशवे हे सामान्य कुटुंबातून आलेले लढवय्ये नेते असून त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाची सुरुवात तळागाळातूनच केली आहे त्यांनी समाजासाठी वेगवेगळ्या प्रकारचे आंदोलन केले व गरजु रुग्णांना शिबिराच्या माध्यमातुन आजारावर निदान मिळवुन दिले आहे समाजाच्या हक्कासाठी अहोरात्र झटणारे लढवय्ये समाजसेवक म्हणुन प्रचीत आहेत महाराष्ट्र कर्णाटक राज्यात त्यांचा दांडगा लोक संपर्क असुन त्याचा फायदा पक्षाला नक्कीच होईल त्यांनी शिवसेनेची विचारधारा गावागावात आणि खेड्यापाड्यात पोहोचवण्यासाठी सातत्याने मेहनत घेतली आहे किशवे यांनी शिवसेना ओबीसीच्या माध्यमातून गोरगरीब वंचित आणि मागासवर्गीय घटकांची मजबूत संघटना उभी केली आहे तसेच त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील विचारसरणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे या पार्श्वभूमीवर त्यांच्या कार्यकर्त्यांची दखल घेऊन शिवसेना नेतृत्वाने आगामी विधान परिषद निवडणुकीत त्यांना उमेदवारी देऊन ओबीसी व विजेएनटी यांची घटकातील कार्यकर्त्यांना न्याय मिळवून द्यावा अशी अपेक्षा गजभार व आनंद धुळगंडे,अनील धगनरे,अमोल गवते,ज्ञानेश्वर धुळगंडे,राम खरात,पवन धुळगंडे ,बालाजी थगनरे,मोहन थगनरे,हाणमंत डोरगळे,शंकर डेमाले,श्रीधर धुळगंडे आदी त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## भोकर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**भोकर** -राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सार्वजनिक जयंतीनिमित्त रविवार दि. २६ एप्रिल २०२६ रोजी विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनीक जयंती समिती मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.या निमित्ताने रविवारी सकाळी ८.३० वाजता शहरातील विविध बुद्ध विहार ठिकाणी बुद्धरश्मी(पंचशील)ध्वजारोहणाचे कार्यक्रम होणार आहेत. महात्मा फुले नगर येथील लुंबिनी बुद्ध विहार येथे डॉ. साईनाथ वाघमारे यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल तसेच शहीद प्रफुल नगर येथील सम्यक बुद्ध विहार संबोधी परिसरात रामराव लोखंडे, पंचशील बुद्ध विहार येथे रमेश गायकवाड, समतानगर येथील अशोका बुद्ध विहार येथे संदीप लोमटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे.याशिवाय आंबेडकर नगर येथे गौतम कसबे, अशोक नगर (गंदेवार कॉलनी) येथे डॉ. बालाजी अंदबोरीकर व नगरसेवक अविनाश वाघमारे, पंचशील नगर येथे योगेश भोकरकर व गणेश यशवंतकर,तर इंदिरा नगर येथे संदीप वाघमारे यांच्या हस्ते बुद्धरश्मी (पंचशिल) ध्वजारोहण होणार आहे त्या नंतर सकाळी ९.३० वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे नगराध्यक्ष भगवान दंडवे यांच्या हस्ते मुख्य बुद्धरश्मी (पंचशिल) ध्वजारोहण सोहळा पार पडणार आहे या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती तहसिलदार विनोद गुंडमवार, नगरसेवक गणेश बोलेवार, साईप्रसाद जटालवार, विठ्ठल धोंडगे, पंकज पोकलवार, सुहास पवार, सिध्देश्वर पिटलेवाड, राजेश्वर देशमुख, दिनेश लक्षटवार, सना इनामदार, डॉ. फेरोज इनामदार, दिलीप सोनवाडे, गौतम कसबे, डॉ. बालाजी अंदबोरीकर, अविनाश वाघमारे, संजय घंटलवार,विकास क्षीरसागर,शेख युसुफ भाई, नाजिम शेख,मनोज गिमेकर,विजय पवार अदिची उपस्थिती लाभणार आहे,विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी ४ वाजता महात्मा फुले नगर येथून राष्ट्रनिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रासह भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून ती शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणार आहे. या मिरवणुकीत मोठ्या संख्येने बौद्ध बांधव व नागरीक सहभागी व्हावे या प्रसंगी अन्नदाना सह थंड पेयचा मोफत वाटप होणार आहे या सर्व कार्यक्रमांचे आयोजन राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले असून अध्यक्ष कपील कांबळे,कार्यअध्यक्ष महेंद्र दुधारे ,संदीप गायकवाड,राहुल सोनकांबळे,सल्लागार साहेबराव मोरे, गौतम कसबे, देवा हटकर, जयभीम पाटील, मिलींद गायकवाड रेणापुरकर, संतोष डोंगरे, मनोज शिंदे, सतीष जाधव, छोटू सोनकांबळे, संदीप वाघमारे, संदीप लोमटे, प्रतीक कदम यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

## माता वासवी जन्मोत्सवानिमित्त २६ रोजी भव्य शोभायात्रा

**नांदेड** -येथील आर्य वैश्य परिवार मंडळ, कौठ्याच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आर्य वैश्य कुलस्वामीनी माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सवानिमित्त रविवार, दि. २६ एप्रिल रोजी भव्य शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार, सचिव रितेश अमिलकंठवार, कोषाध्यक्ष सचिन काशेटवार व शोभायात्रा प्रमुख संतोष पांपटवार यांनी दिली. सायंकाळी ४ वाजता शोभायात्रा श्री बालाजी मंदिर, विकासनगर, कौठा येथून निघणार असून हॉटेल आकृती, महात्मा बसवेश्वर पुतळा, लातूर फाटा व शेवटी वासवी माता मंदिर सिडको रोड येथे समारोप होणार आहे. यावेळी उद्घाटन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते होणार असून श्री काशी अन्नपूर्णा सत्रम, महासचिव विलास बच्चू, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा अध्यक्ष नंदकुमार गादेवार, पोलीस निरीक्षक वाहतूक जगन्नाथ पवार, महासभा उपाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांची उपस्थिती लाभणार आहे.

## किनवट वन विभागाची 'सिंघम' स्टाईल कारवाई; सागवान तस्करी करणारा पिकअपसह आरोपी जेरबंद



**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २४ एप्रिल -**

प्रकल्प विभाग किनवट आणि वनविकास महामंडळ शिवणी यांच्या संयुक्त पथकाने डोंगरगाव ते इस्लापूर मार्गावर धाडसी कारवाई केली आहे. चंद्रभागा हॉटेलजवळ फिल्मी स्टाईलने पाठलाग करून सागवान लाकडाने भरलेला पिकअप आणि एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत सुमारे २.५ ते ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

विभागीय व्यवस्थापक, वन प्रकल्प विभाग किनवट व सहाय्यक व्यवस्थापक किनवट यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम आखण्यात आली होती. जलधारा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी बी. बी. संदुपटलवार आणि वनपरिक्षेत्र अधिकारी एस. एन. चोले यांना सागवान तस्करीबाबत गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार डोंगरगाव ते इस्लापूर रस्त्यावर चंद्रभागा हॉटेलजवळ वनविभागाच्या पथकाने सापळा रचला. संशयास्पद पिकअप दिसताच वनविभागाच्या पथकाने त्याचा पाठलाग केला आणि सिनेस्टाईलने गाडी अडवून मुद्देमाल हस्तगत केला. या कारवाईत वनविभागाने १३ नग सागवान आणि तस्करीसाठी वापरण्यात आलेली पिकअप गाडी जप्त केली आहे. जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत अंदाजे अडीच ते तीन लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी एका आरोपीलाही घटनास्थळावरून अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

ही धडक कारवाई यशस्वी करण्यासाठी वनपरिक्षेत्राधिकारी बी. बी. संदुपटलवार व एस. एन. चोले यांच्यासह वनपाल पवार मॅडम, नागरगोजे, वनरक्षक बी. एस. वडजे, एल. जी. हमपल्ले, एम. एम. पाडदे, मोरताडे, सोमासे, केंद्रे, हाळे, मिसे आणि शेळके मामा इत्यादी कर्मचाऱ्यांच्या पथकाने परिश्रम घेतले.

## झाडांना बांधले पुस्तकांचे तोरण

**नांदेड** -जागतिक पुस्तक दिनाच्या औचित्याने २३ एप्रिल रोजी झाडांनाच पुस्तकांचे तोरण बांधून वृक्षराजींच्या सानिध्यात मुक्त बालवाचनालय उपक्रमास प्रारंभ करण्यात आला. जवळा जि.प. शाळेच्या शिक्षकांनी परीक्षा संपल्यानंतर सकाळी दोन तास या उपक्रमासाठी देण्यात येत आहे. या उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

# पो.नि. अतुल भोसले यांच्या नेमणुकीविरोधात जिल्ह्यातील वरीष्ठ पोलीस निरीक्षक मॅटमध्ये धाव घेण्याची शक्यता

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ एप्रिल -**

पोलीस महासंचालकांच्या परिपत्रकाला डावलून बेकायदेशीरपणे स्थानिक गुन्हे शाखेच्या प्रभारी पदी अतुल भोसले यांचे नेमणूक करण्यात आल्याची चर्चा पोलीस दलात सुरु असुन या नेमणुकीविरोधात जिल्ह्यातील काही वरीष्ठ पोलीस निरीक्षक मॅटकडे धाव घेणार असल्याची माहीती आहे.

पोलीस महासंचालकांच्या परीपत्रकानुसार तीन वर्ष पोलीस निरीक्षक म्हणून सलग सेवा होणे आवश्यक आहे, ए ग्रेडचे दोन पोलीस स्टेशन करणे आवश्यक आहे, गुप्तवार्ता विभाग व इतर जे आवश्यक ट्रेनिंग आहे ते करणे गरजेचे आहे तसेच संबंधीत पोलीस निरीक्षकांची कोणतीही चौकशी प्रलंबित असु नये असे स्पषट निर्देश आहेत. परंतु या परीपत्रकाला डावलुन ही नेमणुक करण्यात आली असल्याचे बोलेले जात आहे.

जवळपास एक महीण्यापुर्वी बिलोली येथे विशेष पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाने मोठ्या जुगार अड्ड्यावर कारवाई केली होती. तेंव्हा पो. नि. अतुल भोसले यांना नियंत्रण कक्षात जोडण्यात आले होते. तर अंदाज समितीचे शिष्टमंडळ यांनी बिलोली घाटावर भेट दिली त्यावेळी बिलोलीत अवैधपणे होत असलेला रेती उपसा, रेतीचे ढीगारे पाहून अंदाज समितीने नोंद घेत पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांचे काम योग्य नसल्याचा अहवाल शासनाला दिला असुन त्याची चौकशी प्रलंबित आहे. त्यामुळे पोलीस निरक्षक अतुल भोसले यांची नेमणुक वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. पो. नि. अतुल भोसले हे पोलीस महासंचलकांच्या परीपत्रकातील बाबी पुर्ण करत नाहीत त्यामुळे ही नेमणुक महासंचालकांच्या परिपत्रकांची उल्लंघन करून बेकायदेशीरपणे करण्यात आल्याची चर्चा पोलीस दलात सुरु असुन या नेमणुकीविरोधात जिल्ह्यातील काही वरीष्ठ पोलस निरीक्षक पोलीस महासंचालकांची भेट घेणार तसेच मॅट मध्ये देखील धाव घेणार असल्याचे पोलीस दलात बोलले जात आहे.

# अन्न व औषध प्रशासनाकडून मे. डी. ॲण्ड जी फार्मा या औषधी पेढीची तपासणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २४ एप्रिल -**

देगलूर स्थित मे. डी. ॲण्ड जी फार्मा या औषधी पेढीची २६ ऑगस्ट २०२५ रोजी तपासणी करण्यात आली होती. त्याअनुषंगाने तपासणीमध्ये डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधाची विक्री करणे, परवाने दर्शनीभागी प्रदर्शित न करणे, Tramadol युक्त औषधांच्या संगणकामध्ये नमूद साठा व औषधी दुकानामध्ये असलेला प्रत्यक्ष साठा यामध्ये तफावत आढळून येणे, भागीदारी संपुष्टात आल्याने नियमाप्रमाणे कार्यालयाकडे नवीन परवाने प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज न करणे यासारखे गंभीर मुद्दे आढळून आलेले होते. त्याअनुषंगाने पेढीस कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येवून पेढीचे परवाने २१ डिसेंबर २०२५ पासून रदद करण्यात आले होते.

या कार्यालयाकडे राजेश माणिकराव गरूडकर यांनी नगरपरिषद मालमत्ता क्र. २-८७१ अनुक्रमांक २१९२ यामध्ये ते भोगवटार असून सदरील जागेमध्ये मे. डी. ॲण्ड जी. फार्मा हे औषधी दुकान कार्यरत आहे. ही जागा रिकामी करून मिळणेबाबत या कार्यालयाकडे विनंती केलेली होती. त्याअनुषंगाने या कार्यालयाने पेढीचे उपरोक्त नमूद प्रमाणे दोन्ही भागीदारास पत्र पाठवून जागा ताब्यात असल्याबाबतची नव्याने कागदपत्रे सादर करण्याविषयी सुचित केले होते. सदरील जागेबाबत संभ्रम असल्याने मुख्याधिकारी, नगरपरिषद, देगलूर यांना पत्र देवून सदरील जागेच्या भोगवटादारबाबत या कार्यालयास माहिती उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली होती.

मुख्याधिकारी, नगरपरिषद देगलूर यांनी राजेश माणिकराव गरूडकर यांची भोगवटादार म्हणून २४ फेब्रुवारी २०२६ रोजी गाळयाची मुदत संपुष्टात आल्याने त्यांना दुकान गाळा रिकामा करण्याबाबत नोटीस तामील करण्याबाबत या कार्यालयास कळविले आहे.

याबाबीवरून सदरची जागा सद्यः स्थितीमध्ये मे. डी. ॲण्ड जी. फार्मा या औषधी पेढीचे भागीदार शशिकांत माणिकराव गरूडकर व गजानन प्रकाश ढगे तसेच राजेश माणिकराव गरूडकर यांच्या ताब्यात नसल्याचे स्पष्ट झाल्याने औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम १९४५ अन्वये मे. डी. ण्ड जी. फार्मा या पेढीचे परवाने २१ एप्रिल २०२६ पासून रदद करण्यात आलेले आहेत.



**नांदेड - राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई-सुभाष, वसंतनगर, नांदेड या निवासस्थानी भेट दिली असता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व चिखलीकर परिवाराच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश सरचिटणीस मोहम्मद खान पठाण, नगरसेवक साबेर चाऊस, नगरसेवक हबीब बावजीर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष एडवोकेट जमील पटेल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण उपाध्यक्ष बाबुराव कदम बिल्लाळीकर, बाबुराव गुजरवाड, बळवंत तेलंग यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.**

# लाखोंचा निधी गेला पण सुविधा शून्यच ; इस्लापूर ग्रामपंचायतीचा कारभार उघडा

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. २४ एप्रिल -**



इस्लापूर ग्राम पंचायतीच्या कारभारातील निष्काळजीपणा, नियोजनाचा पूर्ण अभाव आणि जनतेच्या मूलभूत गरजांकडे केलेले दुर्लक्ष यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या मुताऱ्या आज पूर्णतः निष्क्रिय, अस्वच्छ आणि वापरण्यायोग्य नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ना पाणी, ना स्वच्छता, ना देखभाल म्हणजेच कुठलीच सुविधा नाही! परिणामी प्रवासी, नागरिक, महिला आणि वृद्धांना उघड्यावर जाण्याची वेळ येत असून, हा प्रकार मानवी सन्मानालाच तडा देणारा ठरत आहे.

ग्रामपंचायतीने मुतारी बांधकामाचे मोठे श्रेय घेत उद्घाटनांचे सोहळे पार पाडले, फलक झळकवले, छायाचित्रे प्रसिद्ध केली; मात्र त्यानंतर या सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. आज या मुताऱ्यांची अवस्था इतकी बिकट झाली आहे की, पाण्याचा मागमूस नाही, सर्वत्र कचरा आणि घाणीचा सडा, असह्य दुर्गंधी त्यामुळे त्या वापरणे तर दूरच, तिकडे जाणेही अवघड झाले आहे. परिणामी या सुविधा केवळ दाखवण्यासाठी उभ्या असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे, इस्लापूरमधील अनेक बँका आणि शासकीय कार्यालयांमध्येही नागरिकांसाठी बाथरूमची कोणतीही सुविधा उपलब्ध नाही. खेड्यापाड्यांतून येणारे शेतकरी, महिला, वृद्ध नागरिक आणि सर्वसामान्य लोक तासन्तास रांगेत उभे राहून काम करतात; मात्र नैसर्गिक विधीसाठी कुठलीही सोय नसल्याने त्यांची अक्षरशः परवड होत आहे. अनेक वेळा त्यांना उघड्यावर जाण्याची वेळ येते ही केवळ गैरसोय नाही, तर प्रशासनाच्या असंवेदनशीलतेचे आणि अपयशाचे जिवंत उदाहरण आहे.

महिलांसाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरत आहे. सन्मान, सुरक्षितता आणि आरोग्य या तिन्ही बाबींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वृद्ध नागरिकांना दीर्घकाळ थांबणे कठीण होत असून, त्यांना या समस्येचा सर्वाधिक फटका बसत आहे.

या प्रकारामुळे सार्वजनिक आरोग्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अस्वच्छता, दुर्गंधी आणि संसर्गजन्य आजारांचा धोका वाढत असताना ग्रामपंचायत आणि संबंधित यंत्रणा पूर्णपणे निष्क्रिय असल्याचा आरोप होत आहे. परिसरात राहणाऱ्या नागरिकांनाही या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

**काम करा, निधी खर्च करा, उद्घाटन करा आणि मग सर्व काही विसरा!**

दरम्यान, या कामांसाठी खर्च झालेल्या लाखो रुपयांचा हिशेब कुठे आहे? देखभालीसाठी निधी कुठे गेला? पाणीपुरवठ्याचे नियोजन का झाले नाही? बाथरूमसारख्या मूलभूत सुविधांकडे इतके दुर्लक्ष का? या सर्व प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. ग्रामपंचायतीचे मौन संशय अधिकच गडद करत असुन आता आंदोलनाशिवाय पर्याय नसल्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

# ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्यसंवर्धन आणि आयुर्वेदीय उपचार

**मुंबई |** आयुर्वेदामध्ये 6 ऋतूंचा उल्लेख आहे, जे भारत देशात निसर्गाने दिलेले आहेत हेमंत, शिशिर, वसंत, ग्रीष्म, वर्षा आणि शरद. होळीच्या सणासोबतच ग्रीष्म ऋतूचे आगमन होते. शिशिरानंतर वसंत ऋतूमुळे झाडांना नवीन पालवी फुटते. चारही बाजूंना हिरवळ पसरलेली असते, ज्यामुळे मनात एक नवीन उत्साह आणि आनंद निर्माण होतो. अशा वातावरणात सूर्यही हळूहळू आपल्या प्रखर किरणांनी उन्हाळ्याची चाहूल देतो.

ग्रीष्म ऋतूमध्ये आरोग्य स्वस्थ ठेवण्यासाठी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. कारण सूर्यकिरणांच्या तिव्रतेमुळे उष्णतेचा त्रास होऊन शरिरात विविध त्रास उत्पन्न होतात. म्हणून आयुर्वेदानुसार उन्हाळ्यात अशा पदार्थांचे सेवन करावे जे शरिरातील पाण्याची कमतरता भरून काढतात. फळे आणि भाज्यांचे अधिक सेवन करावे. काकडी, कोशिंबीर, कांदा, पुदिन्याचा वापर अधिक करावा. भरपूर पाणी प्यावे.

## मोटोरोला एज ७० प्रो लाँच

मुंबई : मोटोरोला या मोबाइल तंत्रज्ञान व नाविन्यतेमधील जागतिक अग्रणी आणि भारतातील आघाडीच्या~ एआय स्मार्टफोन ब्रँडने आज मोटोरोला एज ७० प्रो लाँच केला, जो वापरकर्त्यांना प्रगत लो-लाइट फोटोग्राफीसह रात्रीच्या वेळी किंवा अंधुक प्रकाशात सुस्पष्टपणे फोटो कॅप्चर करण्यास मदत करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. या स्मार्टफोनमध्ये आकर्षक व्हिज्युअलस आणि नेक्स्ट-जनरेशन ऑन-डिवाईस एआय आहे. या डिवाईसमध्ये ट्रिपल 50 मेगापिक्सल प्रो-ग्रेड कॅमेरा सिस्टम आहे, ज्यामध्ये मुख्य प्रगत सोनी-एलवायटीआयए™ 710 कॅमेरासह मोटो एआय आहे, जे रात्रीच्या वेळी आकर्षक फोटोग्राफी, अंधुक प्रकाशात उच्च दर्जाची सुस्पष्टता, ब्लर-फ्री फोटोज, पॅन्टोन™ व्हॅलिडेटेड टू कलर्स आणि स्किनटोन™ अचूकता देतात. तसेच सर्व कॅमेऱ्यांमध्ये 4के 60एफपीएस व्हिडिओ रेकॉर्डिंग करता येते. मीडियाटेक डायमेन्सिटी 8500 एक्स्ट्रीमची शक्ती असलेला हा डिवाईस प्रगत ऑन-डिवाईस एआय प्रोसेसिंगसह अंधुक प्रकाशात सुस्पष्टपणे फोटो कॅप्चर करतो. मोटोरोला एज ७० प्रोमध्ये नवीन कलेक्शन्स बाय मोटोरोला डिझाइन सादर करण्यात आली आहे,

## एक्सपर्टबुक अल्ट्रा सादर

दिल्ली : आसुस ने आज, खऱ्या अर्थाने चिंतामुक्त व्यावसायिक अनुभवासाठी, उद्योगातील सर्वोत्कृष्ट फ्लॅगशिप असलेल्या एक्सपर्टबुक अल्ट्रा च्या लॉन्चची घोषणा केली, तसेच बहुपयोगी एक्सपर्टबुक पी सिरीज पोर्टफोलिओमध्ये लक्षणीय विस्तार केला आहे. आसुस एक्सपर्टबुक अल्ट्रा हा एक कोपायलट+ पीसी आहे, जो सीएक्सओ आणि व्यावसायिक नेत्यांना अल्ट्रा -लाइट डिझाइन, उत्कृष्ट अत्याधुनिक एआई -शक्तीवर चालणारी कामगिरी, आकर्षक डिस्प्ले, इमर्सिव्ह ऑडिओ, दिवसभर टिकणारी बॅटरी, सर्वोत्तम टायपिंग अनुभव, सेगमेंटमधील अग्रगण्य मिलिटरी-ग्रेड स्थायित्व एंटरप्राइझ-ग्रेड सुरक्षा, सुपर प्रीमियम एंटरप्राइझ-ग्रेड सर्व्हिस सपोर्ट आणि अखंड विस्तारक्षमतेद्वारे खरे लक्ष केंद्रित करण्यास आणि उत्कृष्ट मानसिकता प्राप्त करण्यास सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेला आहे.

## पुदिन्याचे महत्त्व प्रस्थापित करणे' ही मोहीम सुरू

छत्रपती संभाजीनगर - - आयुर्वेदिक औषधी वनस्पतींच्या फायद्यांना प्रोत्साहन देण्याच्या आपल्या मोहिमेला पुढे नेत, भारतातील सर्वात मोठी विज्ञान-आधारित आयुर्वेद कंपनी, डाबर इंडिया लिमिटेडने, पुदिन्याला एक अद्भुत औषधी वनस्पती म्हणून प्रस्थापित करण्यासाठी एक मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम आज येथे आयोजित एका कार्यक्रमात सुरू करण्यात आली. या प्रसंगी, डॉ. अजय माने यांनी पुदिन्याच्या फायद्यांविषयी बोलताना स्पष्ट केले की, पुदिन्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायटोन्यूट्रिएंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे मानवी पोटासाठी, विशेषतः कडक उन्हाळ्यात, खूप फायदेशीर ठरू शकतात. उष्णतेच्या लाटांची वाढती वारंवारता आणि वाढत्या तापमानामुळे, उन्हाळ्यात आरोग्याच्या समस्या सामान्य झाल्या आहेत. या तीव्र हवामानातील संभाव्य आरोग्य समस्या लक्षात घेऊन, जे लोक जास्त वेळ उन्हात घालवतात आणि ज्यांना उन्हाळ्यातील सामान्य आजार होण्याची शक्यता असते, त्यांच्यासाठी डाबर पुदिन्याच्या वापराची शिफारस करते.

## पशुधन विकास प्रकल्पाची सुरुवात

मुंबई : दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड ची १००% उपकंपनी असलेल्या महाधन ॲग्रीटेक लिमिटेडने आपल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी उपक्रमांतर्गत मराठवाडा विभागातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात "महाधन पशुधन विकास प्रकल्प" सुरू केला आहे. हा प्रकल्प बीएआयएफ लाईव्हलीहूड अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची संकल्पना आणि अंमलबजावणी श्री एस. सी. मेहता, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, डीएफपीसीएल आणि श्रीमती पारुल मेहता, मॅनेजिंग ट्रस्टी, आयसफॉन यांच्या दूरदृष्टी आणि मार्गदर्शनाखाली साकारली आहे.

## उन्हाळ्यात लहान मुलांची घ्या विशेष काळजी – डॉ. राहुल गोसावी

छत्रपती संभाजीनगर: वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे अत्यावश्यक असल्याचे मत डॉ राहुल गोसावी बालरोग तज्ज्ञ, मेडिकव्हर हॉस्पिटल यांनी व्यक्त केले आहे.उन्हाळ्यात लहान मुलांना डिहायड्रेशन, उष्माघात (हीट स्ट्रोक), तसेच विविध संसर्गजन्य आजारांचा धोका अधिक असतो. त्यामुळे पालकांनी मुलांच्या आहार, पाण्याचे प्रमाण आणि दैनंदिन सवयींकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.डॉ. गोसावी म्हणाले, "मुलांना वारंवार पाणी व द्रवपदार्थ देणे आवश्यक आहे. दुपारच्या कडक उन्हात (सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत) मुलांना बाहेर जाणे टाळावे. हलके, सूती कपडे वापरावेत आणि स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे.

## पोकोकडून पोको सी81 सिरीज लाँच

बेंगळुरू - पोको या तरुण तंत्रज्ञानप्रेमींमध्ये लोकप्रिय असलेल्या आघाडीच्या ब्रँडने आज पोको सी81 सिरीजच्या लाँचची घोषणा केली. या सिरीजमध्ये पोको सी81 आणि पोको सी81x या दोन मॉडेल्सचा समावेश आहे. विश्वासार्ह परफॉर्मन्स, मोठा आकर्षक डिस्प्ले आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी प्रदान करण्यासाठी डिझाइन केलेली ही नवीन सिरीज दैनंदिन वापरकर्त्यांच्या गरजा पूर्ण करते. पोको सी81 सिरीजमध्ये आकर्षक डिस्प्ले आहे, जो दैनंदिन व्युईंग अनुभव उत्साहित करण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. पोको सी81 मध्ये ६.९-इंच एचडी+ डिस्प्ले आहे, तर पोको सी81x मध्ये ६.८८-इंच एचडी+ डिस्प्ले आहे. दोन्ही डिवाईसेस ब्राऊझिंग, स्ट्रीमिंग आणि सोशल मीडियासाठी आकर्षक व्हिज्युअल्स देतात.

## एलपीजी उपलब्धतेबाबत ग्राहकांमध्ये आत्मविश्वास वाढला

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाद्वारे , ग्राहक संरक्षण, कामामधील पारदर्शकता आणि सुरळीत कार्यप्रणालीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. एमओपीएनजी सुनियोजित कामाद्वारे स्वच्छ स्वयंपाकाच्या इंधनाची पुरवठा साखळी अधिक बळकट करत आहे. इंधनाचा साठा करुन ठेवणे आणि काळाबाजार यांसारख्या गैरप्रकारांविरुद्ध देशव्यापी मोहिमेद्वारे कडक अंमलबजावणी करण्यात आली आहे. तसेच संपूर्ण देशभरात एलपीजीचा सातत्यपूर्ण आणि विनाअडथळा पुरवठा सुरळीत व्हावा याकडे अधिक भर देण्यात आला आहे. त्याचबरोबर, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर आणि वितरण व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवल्यामुळे जबाबदारी आणि सेवा वितरणात सुधारणा होत आहे. याद्वारे कार्यप्रणालीवर जनतेचा विश्वास अधिक दृढ होत आहे.

# भाजपा महिला व्यापारी आघाडीचा बेकिंग वर्कशॉप उत्साहात पार



**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी |** भाजपा महिला व्यापारी आघाडी, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेले बेकिंग वर्कशॉप नुकतेच अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या सहभागासह यशस्वीरित्या पार पडले. या उपक्रमाला शहरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, सहभागी महिलांना बेकिंग क्षेत्रातील विविध तंत्रांची सखोल माहिती मिळाली.

या कार्यशाळेच्या यशामागे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे नियोजनबद्ध प्रयत्न आणि उत्कृष्ट समन्वय महत्त्वाचा ठरला. अध्यक्षा पल्लवी सुराणा, उपाध्यक्षा स्मिता गरुड जी तसेच सचिव सानिया हुरसुलखर रुपाली मोरे माने आणि अंतरा बॅनर्जी यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

कार्यशाळेला शेफ रुपाली बाठिया यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी बेकिंगमधील आधुनिक तंत्रज्ञान, नव्या रेसिपीज तसेच व्यवसायिक संधी याबाबत मार्गदर्शन करून उपस्थितांना प्रेरित केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सहभागी महिलांना नवीन कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून छाया ताई खोजेकर उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना स्वावलंबन आणि उद्योजकतेसाठी प्रेरित केले. तसेच भाजप व्यापारी आघाडीचे अध्यक्ष हितेश भैय्या जी कांकरीया यांनीही आपल्या मार्गदर्शनातून कार्यक्रमाच्या यशात मोलाचा वाटा उचलला.

कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी सर्व सहकाऱ्यांचे व सहभागींचे आभार मानले. महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा उपक्रम एकजूट आणि समर्पणाचे उत्तम उदाहरण ठरला. भाजपा महिला व्यापारी आघाडीच्या वतीने अशा प्रकारचे अनेक उपक्रम भविष्यातही आयोजित करण्यात येणार असून, महिलांना सक्षम करण्यासाठी संघटना कटिबद्ध असल्याचे सांगण्यात आले.

# मंत्रालयात पैठण शहरातील अतिक्रमण प्रश्नावर महत्त्वपूर्ण चर्चा



तभा वृत्तसेवा

पैठण दि २१ :- महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी मंत्रालयात पैठण शहरातील शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे नियमाकुल करण्याबाबत तसेच पात्र लाभार्थ्यांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार विलास बाप्पू भुमरे, भूषण कावसणकर, उप नगराध्यक्ष तुषार पाटील, उप जिल्हा प्रमुख विनोद बोंबले यांच्या वतीने सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत लोकप्रिय आमदार विलास बाप्पू पा. भुमरे यांनी पैठण शहरातील नागरिकांच्या अडचणी मांडत, अतिक्रमणांचे नियमितीकरण करून त्यांना शासनाच्या घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली.यावेळी मंत्री बावनकुळे यांनी सदरील मुद्दे नवीन शासकीय धोरनानुसार सोडवण्याचे अश्वासन दिल्याने पैठणकरांना आता हक्काची जागा आणि घरकुलाचा लाभ मिळणार आहे.

# श्री 1008 चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर, विष्णुनगर येथे वर्धापन दिन साजरा



छत्रपती सभाजीनगर (प्रतिनिधी) – श्री 1008 चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिर, विष्णुनगर येथे मंदिराच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अक्षय तृतीयेच्या पावन मुहूर्तावर रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी मंगल कलश मिरवणुकीने झाली. मंगल कलशाचा मान सौ. वर्षा राहुल गोसावी यांना मिळाला. ध्वजारोहणाचा मान शैलेश चंद्रशेखर सोनटक्के यांनी भूषविला. त्यानंतर भगवानांच्या प्रतिमेवर जलाभिषेक, इक्षुरस अभिषेक, केशर अभिषेक, पुष्पवृष्टी व मंगल आरती करण्यात आली.

पंचपरमेष्ठी विधानासाठी विविध मान्यवरांना मान देण्यात आला. यामध्ये धर्मेंद्र-इंद्रायणी म्हणून जयकुमार कुलभूषण वायकोस व सौ. स्नेहा जयकुमार वायकोस, कुबेर-इंद्र म्हणून सचिन सुभाष शिरसागर व सौ. पूजा सचिन शिरसागर, राजा श्रेयांश म्हणून संजयकुमार शाहूराव बुजुर्गे व सौ. रुपाली संजयकुमार बुजुर्गे, तसेच राजा सोम म्हणून अमोल सुभाषराव तरटे व सौ. आरती अमोल तरटे यांचा समावेश होता. यज्ञनायक बाहुबली म्हणून श्रीनाथ वायकोस व सौ. अनिता श्रीनाथ वायकोस यांनी मान स्वीकारला.

कार्यक्रमात अल्पोपहाराची व्यवस्था रमेश नानुराम काळे यांनी केली, तर दुग्धपानाची सेवा शुभम धन्यकुमार घोडके यांनी दिली. संपूर्ण पंचविधान विधी विधानाचार्य पंडित राजेशजी रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली संगीतमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता सिंधी भवन येथे महाप्रसादाने करण्यात आली. सायंकाळी संगीतमय आरती व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या भव्य कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व विश्वस्त मंडळ, पदाधिकारी तसेच संस्कृती नवकार महिला मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील खेळाडू तेजस्विनी चौधरीचा गौरव



**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.२४ एप्रिल

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या क्रीडा विभागातील कुशल खेळाडू तथा बी.एस.सी.(B.Sc.) तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु.तेजस्विनी चौधरी हिची मुंबई लोहमार्ग पोलीस दलात निवड झाल्याबद्दल महाविद्यालयात तिचा व तिच्या वडिलांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,डॉ. अंभोरे,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर,डॉ. गणेश मिसाळ,प्रा.कमलेश काळे,प्रा.अश्विनी काळे,सुनील साळुंखे,सुनील वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी तेजस्विनीच्या यशाबद्दल अभिनंदन करून तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तिच्या या यशामुळे महाविद्यालयाचा गौरव वाढला असून इतर विद्यार्थ्यांसाठीही ती प्रेरणादायी ठरली आहे.

# सोयगाव येथे एस. आर. टी. शेती शाळा संपन्न



**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि.२४ एप्रिल |** सोयगाव येथील शेतकरांना जळगाव जिल्हा एस.आर. टी.प्रचारक राहुल पाटील व परशुराम देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम राम कलर दुकान सोयगाव येथे उत्साहात संपन्न झाला. शेतकरी बांधवांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला.या शेती शाळेत राहुल,परशुराम यांनी एस.आर.टी.शेतीचे महत्त्व,मातीची सुपीकता,कमी खर्चातील शेती,सेंद्रिय कर्ब वाढ आणि शाश्वत शेती याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.त्यांनी मक्का,कापूस या पिकासाठी आपल्या शेतात एस.आर. टी.तंत्रज्ञानाचा वापर करून प्रथमच कापूस पिक घेत एका एकरात उत्पन्न १६ क्विंटल घेतले.कृषीभूषण अरूण सोहणी यांनी या पध्दत तीचे स्वागत करत या पध्दत मूळे तरुण वर्ग शेतीकडे वळेल व अधिक चांगल्या प्रकारे उत्पादक घेईले आसे मनोगत व्यक्त केले.प्रदीप चौधरी यांनी सुरू केलेल्या एस.आर.टी.शेती विषयी सविस्तर माहिती देत, ही पद्धत शेतकऱ्यांसाठी किती फायदेशीर आहे हे पटवून सांगितले. जमीन जिवंत ठेवायची असेल तर एस.आर.टी.स्वीकारणे गरजेचे आहे,हा संदेश त्यांनी दिला.खर्च कमी,उत्पादन चांगले,जमिनीचा पोत सुधारणा आणि नैसर्गिक शेतीकडे वाटचाल या एस.आर. टी.च्या फायद्यांवर विशेष चर्चा झाली. शेतकऱ्यांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

एस.आर.टी.शेती ही फक्त पद्धत नाही,तर शेतकऱ्यांच्या समृद्धीकडे नेणारी चळवळ आहे.हा विश्वास या शेती शाळेत अधिक मजबूत झाला.अशा मार्गदर्शनातून शेतीत नक्कीच सकारात्मक बदल घडतील. या प्रसंगी भास्कर चौधरी यांनी जलतारा प्रकल्पाचे महत्त्व सांगितले.शेवटी आभार रघुनाथ काटोले यांनी केले.यावेळी सोयगाव शहरातील शेतकरी

महेंद्र पिळगावकर,गणेश बागले,प्रकाश बोर्डे,किरण सपकाळ,रुपचंद परदेशी,छोटू पाटील, भैय्या चौधरी,अक्षय चौधरी,सुरेश फुसे,गणेश जोहरे,सुनिल चौधरी,आदींसह शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मयत अनोळखी महिले विषयी माहिती कळविण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर |** रेल्वे स्टेशन पोलीस चौकी शेजारील पत्र्याच्या शेडजवळ बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेल्या महिलेस घाटी रुग्णालयात दाखल केले असता तिच्यावर उपचार सुरु असतांना त्यास डॉक्टरांनी दि १५ एप्रिल रोजी मयत घोषीत केले. या प्रकरणी वेदांत नगर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली असून अनोळखी मयत महिलेबाबत माहिती कळविण्याचे आवाहन वेदांत नगर पोलीस निरीक्षक यांनी केले आहे.

मयताचे वर्णन- नाव (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही.), वय अंदाजे ६० वर्षे, अंगात केशरी रंगाची सलवार त्यावर सोनेरी डिझाईन, रंग गव्हाळ, चेहरा लांबट गोल, उंची पाच फुट,केस काळे -पांढरे.या वर्णनाच्या महिलेबाबत काही माहिती मिळाल्यास वेदांत नगर पोलिसांत किंवा सहायक फौजदार एन.व्ही. खराडकर,मो. नं ८८०५०५८२२२ यांच्याशी संपर्क साधावा,असे आवाहन पोलीस निरीक्षक, वेदांत नगर पोलीस स्टेशन यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# जिल्ह्यात 73.69 टक्के मतदारांचे मॅपिंगचे काम पूर्ण

**छत्रपती संभाजीनगर |** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) अंतर्गत जिल्ह्यात मतदार मॅपिंगचे काम सुरू आहे. या मोहिमेत दि. २४ एप्रिल पर्यंत एकूण ३२ लाख ५१ हजार ८६२ मतदारांपैकी २३ लाख ९६ हजार ३२३ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून एकूण प्रगती ७३.६९ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे,अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधरी यांनी दिली आहे. उर्वरित काम गतिने पूर्ण करण्यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्यात यावी असे निर्देशही देण्यात आले.

विधानसभा मतदारसंघनिहाय प्रगतीमध्ये सिल्लोड (८६.३९%), कन्नड (८९.८०%), फुलंब्री (६९.६८%), औरंगाबाद मध्य (५४.९०%), औरंगाबाद पश्चिम (५८.८५%), औरंगाबाद पूर्व (५८.०८%), पैठण (८२.२१ %), गंगापूर (७७.५७%) आणि वैजापूर (९२.५३%) अशी नोंद झाली आहे. या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सविता चौधरी यांनी नायब तहसीलदार निवडणूक यांची बैठक घेतली.

**जाहीर प्रगटन**

**मा. जिल्हा व सत्र न्यायधिश तिसरे श्री. एन. पी. मेहता साहेब, औरंगाबाद यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १४९/२०२६.
पुढची तारीख २०/०६/२०२६.

१. श्वेता विजयकुमार संचेती, वय ५३ वर्षे धंदा शेती, रा. जैन मंदीराजवळ, गांधी चौक पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव, २. उत्कर्ष विजयकुमार संचेती, वय १५ वर्षे धंदा शिक्षण (ईयत्ता नववी). अज्ञानपालनकर्ता म्हणुन अर्जदार क्रं. १., ३. रुषभ विजयकुमार संचेती, वय २७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

महाराष्ट्र सरकार तर्फे जिल्हाधीकारी, औरंगाबाद

प्रकरण :-अज्ञान मुलाच्या नावावर असलेली मिळकत विक्री करण्याची परवानगी मिळणे कलम ८ हिंदु मायनॉरीटी गार्डीयन ॲक्ट १९५६ अन्वये...

ज्याअर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात ॲड. स्वप्निल र. सुरळकर, यांच्या मार्फत अज्ञान मुलाच्या नावे असलेले मिळकत कलम ८ हिंदु मायनॉरीटी ॲक्ट १९५६ विक्री करण्याची परवानगी मिळावी याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार क्रं. १ ही मयत विजयकुमार सुमनलाल संचेती यांची कायदेशीर पत्नी असुन अर्जदार नंबर २ व ३ हे मुले आहेत. मयत विजयकुमार सुमनलाल संचेती यांचा दिनांक २६/०६/२०१३ रोजी पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव येथे मृत्यु झालेला आहे. मिळकत गट नंबर १०५ पैकी १ हे. ६६ आर ४ आर पोटखराब मौजे पोहरी बु., ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर ही मिळकत मयत विजयकुमार सुमनलाल संचेती यांच्या नावे होती. ते मयत झाल्यानंतर सदर मिळकत ही अर्जदार क्रं. १ ते ३ यांच्या नावे वारसाआधारे आलेली आहे. अर्जदार क्रं. २ हा अज्ञान असुन अर्जदार क्रं. १ हो त्याची आई/पालनकर्ता आहे. अर्जदार क्रं. २ च्या पुढील शिक्षण, वैदयकीय व ईतर खर्चासाठी वर नमुद मिळकत ही अर्जदार यांना विक्री करावयाची आहे.

तरी ज्या कोणाला सदर प्रकरणा संबंधी उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा प्रकरणात योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल.

आजरोजी दिनांक /०४/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

आदेशावरुन

विभागीय लिपीक अधिक्षक

जिल्हा न्यायालय औरंगाबाद

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 88/2026.

अर्जदारः-1) उपाबाई धनराज वाघ, यय 55 वर्षे, धंदा शेती, 2) पंडीत धनराज वाघ, वय 38 वर्षे, धंदा शेती. 3) अमोल धनराज वाघ, वय 31 वर्षे, चदा शेती, वरील सर्व रा. कंकराळा ता. सोयगांव जि छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी चारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे धनराज रामकृष्ण बाघ हे दिनांक : 02/09/2024 ला मौजे कंकराळा ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांकः12/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :- 24/04/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- 145/2025

अर्जदारः- 1) शकुंतलाबाई धुडकु गायकवाड, ययः 70 वर्षे, धंदाः शेती 2) समाधान धुडकु गायकवाड, ययः 34 वर्षे, धंदा शेती. 3) अनिल धुडकु गायकवाड, वयः 32 वर्षे, घंदा शेती. 4) साधनाबाई भगवान गायकवाड, वयः 40 वर्षे, धंदाः शेती 5) राजश्री पिता भगवान गायकवाड, ययः 17 वर्षे, अ. पा. क. अर्जदार नं. 04. 6) वंश पिता भगवान गायकवाड, ययः 15 वर्षे, अ. पा. क. अर्जदार नं. 04. वरील सर्व अर्जदार रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) 7) सुनंदाबाई गजानन झुंझाराव, वयः 42 वर्षे, धंदाः घरकाम, रा. देवश्री कॉलोनी पीतमपुर, वॉर्ड नं. 15. म. न. ए./13, पीथमपुर, धार ता. व जि. धार (मध्य प्रदेश) 8) सविताबाई प्रविन सुर्यवंशी, वयः 38 वर्षे, धंदाः शेती, रा. धामणगांव (बडे) ता. मोताळा जि. बुलढाणा.

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे कै. धुडकु शंकर गायकवाड, हे दिनांकः 17/02/2025 ला मौजे जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असून त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः-13/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदाराना कायदेशीर पारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः-21/04/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**गा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 23/2026.

अर्जदारः- 1) पृथ्वीराज चुडा शिरसाठ, वय-56 वर्षे धंदा-शेती 2) ज्योतीराम घुडाराम शिरसाठ, वयः 58 वर्षे, धंदाः शेती, रा. वडगाव (ती) ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर). 3) गुनाबाई नगराज पाटील यय-64 वर्षे, धंदा शेती रा. शिरसमनी ता. पारोळा जि. जळगाव 4) अनिताबाई संतोष आमले वय 55 वर्षे, धंदा शेती रा. वडाळी (यडळा) ता.बाळीसगाव जळगाव 5) अरुणाबाई बापूराव जाधव वय 52 वर्षे धंदा शेती रा.सावरगाव ता. नांदगाव जि. नाशिक 6) कल्पना सुनिल पाटील यय-50 वर्षे धंदा-शेती रा.पाथरी ता. व जि. जळगाव

// विरुध्द //

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपन्नासाठी अर्ज केलेला आहे. मयत्त नामे यच्छालाबाई घुडामन पाटील (शिरसाठ) द्या दि. 02/10/2024 ला मौजे वडगाव (ती) ताः सोयगांव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मयतयेथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः 10/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः 24/04/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव

**फॉर्म आयएनसी – २६**
**सार्वजनिक सूचना**

(नियम २७, नियम २८ नुसार कंपन्या (निगमन) नियम, २०१४)

कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय एका आरओसी वरून दुसऱ्या आरओसी, एकाच राज्याच्या अधिकारक्षेत्रात बदलण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करावी.

केंद्र सरकार, पश्चिम विभाग, मुंबई यांच्या समक्ष

कंपनी कायदा २०१३ च्या प्रकरणी सदर कायद्याचेकलम१२(४),१२(५),१२(६) आणि १३ ; तसेच कंपनी (स्थापना) नियम, २०१४ चे नियम २७ व २८ ; आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रतिनिधित्व) नियम, २०१४ चा नियम २२ यांच्या संदर्भातील प्रकरणी

आणि

राजयोग पेरिफेरल्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाबतीत

सी आय एनः U72100MH2000PTC129313

नोंदणीकृत कार्यालय, दुकान क्रमांक 98, सिंधी कॉलनी शॉपिंग कॉम्प्लेक्स, जालना रोड, छत्रपती संभाजी नगर–431005

याचिकाकर्त्याकडून सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२(४), १२(५), १२(६) व १३ अंतर्गत कंपनी राजयोग पेरिफेरल्स प्रायव्हेट लिमिटेड हि, केंद्र सरकारकडे अर्ज करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे, ज्यामध्ये गुरुवार, २३ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर झालेल्या विशेष ठरावाच्या अनुषंगाने कंपनीच्या मेमोरँडम ऑफ असोसिएशनमध्ये बदल करण्याची पुष्टी मिळावी यासाठी कंपनीला तिचे नोंदणीकृत कार्यालय ''रजिस्ट्रार ऑफ कंपनीज मुंबई, महाराष्ट्र राज्य'' वरून ''रजिस्ट्रार ऑफ कंपनीज पुणे, महाराष्ट्र राज्य'' असे करता येईल. प्रस्तावित बदलामुळे ज्या व्यक्तीचे हित प्रभावित होण्याची शक्यता आहे, ती गुंतवणूकदार तक्रार फॉर्म भरून एमसीए पोर्टल (www.mca.gov.in) वर तक्रार दाखल करू शकते किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात तक्रार दाखल करू शकते. या सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत अर्जदार कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात अर्जदार कंपनीची प्रत घेऊन, त्याच्या हिताचे स्वरूप आणि विरोधाचे कारण सांगणारे प्रतिज्ञापत्र, प्रादेशिक संचालक पश्चिम प्रदेश, एव्हरेस्ट, ५ वा मजला, १०० मरीन ड्राइव्ह, मुंबई–४००००२, महाराष्ट्र यांना अर्ज करू शकते किंवा तक्रार दाखल करू शकते. अर्जदाराने कंपनीची प्रत त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवाः दुकान क्रमांक ९८ सिंधी कॉलनी शॉपिंग कॉम्प्लेक्स, जालना रोड, छत्रपती संभाजी नगर–४३१००५

अर्जदारासाठी आणि त्यांच्या वतीने

राजयोग पेरिफेरल्स प्रायव्हेट लिमिटेड

सही/–

संचालक

प्रसाद बसवणप्पा मेंथे

डीन नं. [illegible]

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर दिनांकः २३/०४/२०२६